दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे अंक –२०० मंगळवार,दि.२५ मार्च २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-200 | Tuesday, Dt.25 March 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# यंदा शिक्षकांची उन्हाळ्याची सुट्टी रद्द, विद्यार्थ्यांनाही यातून ‘सुट्टी’ नाही

बीड : जिल्हा परिषदेच्या शाळांच्या शिक्षकांसाठी एक अत्यंत महत्वाची बातमी समोर आली आहे. या शिक्षकांना यावर्षी उन्हाळी सुट्टीतही विद्यार्थ्यांचा अभ्यास घ्यावा लागणार आहे. तसेच दर आठवड्यातील विद्यार्थ्यांचे प्रगतीचे मूल्यांकन करून ३० जूनपूर्वी प्रत्येक विद्यार्थी भाषा आणि संख्याशात्र ज्ञानात परिपूर्ण करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.म्हणजेच यंदा त्यांना उन्हाळ्याची सुट्टी उपभोगता येणार नाही.

शालेय शिक्षण विभागाच्या वतीने यंदा राज्यातील दुसरी ते पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी करण निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत कृती कार्यक्रम राबविण्याचे निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे यंदा सुट्टीतही शिक्षकांना विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अथवा ऑफलाईन अध्यापन करावे लागणार आहे.या उपक्रमातील राज्यातील दुसरी ते पाचवीच्या प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांची किमान ७५ टक्के भाषा आणि अध्ययन क्षमता परिपूर्ण करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. यासाठी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व अनुदानित, खाजगी प्राथमिक, अनुदानित अंशतः अनुदानित या शाळांमध्ये हा उपक्रम सक्तीचा करण्यात आला असून सहावी ते आठवीच्या वर्गासाठी ऐच्छिक ठेवण्यात आलेला आहे.हा उपक्रम राज्यातील सर्व जिल्ह्यात ५ मार्च ते ३० जून या चार महिन्यांच्या कालावधीत राबवण्यात येणार असून यासाठी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना ठरवून दिलेल्या कौशल्यांमध्ये अपेक्षित अध्ययन क्षमता प्राप्त असल्याची पडताळणी करण्यात येणार आहे. यामुळे यंदा उन्हाळ्यातही शिक्षकांना विद्यार्थ्यांना अध्यापनाचे धडे द्यावे लागणार असून अभ्यासाला सुट्टी मिळणार नाही. हा उपक्रम राबवण्यासाठी शिक्षकांना सुट्टीच्या कालावधीत ऑफलाईन अथवा ऑनलाईन अध्यापन करावे लागणार आहे.



## दिंद्रुड हद्दीत स्वत:चे मालकाचे पैसे लुटायचा बनाव करुन पैसे लुटणाच्या गुन्हा केलेल्या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखा,बीड ने केले जेरबंद




दिनांक ११/०३/२०२५ रोजी ०२.०२ वा. सैहीमुद्दीने फैमुद्दीन शेख वय २४ व्यवसाय ड्रायव्हर रा. माजलगाव हा दि.१०/०३/२०२५ ते १८०० वा. सुमारास तेलगांव रोडवर कारी फाटयाजवळ त्याचे ताब्यातील अशोक लेलँड दोस्त वाहन कळंब येथुन के ज,धारुर, तेलगाव मार्गे माजलगावकडे येत असतांना कारी फाटयाजवळ आल्यावर यातील अनोळखी तिघेजन स्पेंडर गाडीवर मागुन येवुन फिर्यादीस शिवीगाळ करु लागले फिर्यादीस काहीतरी झाले असेल असे वाटल्याने गाडी रस्त्याचे बाजुला घेवुन थांबवली असता तिन इसमांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन डोळयात चटणी टाकुन मारहाण करुन गाडीमधील १,३५,८००/– रु रोख रक्कम जबरीने चोरुन नेले असल्याची तक्रार पोलीस स्टेशन ला फिर्यादीने दिली.

वरील नमुद गंभीर गुन्हयाचे अनुषंगाने पो.नि. स्था.गु.शा. श्री. उस्मान शेख यांनी त्यांचे पथकास गुन्हा उकल करण्यासाठी सपोनि विजयसिंग जोनवाल व पोउपनि महेश विग्ने यांना आदेश दिले. पोउपनि महेश विग्ने यांनी

(उर्वरीत पान २ वर)

## बीड जिल्हा परिषदेचा १५ कोटी २१ लाखाचा शिलकीचा अर्थसंकल्प

### सीईओ आदित्य जीवने यांनी केला जाहीर

प्रतिनिधी । बीड

बीड जिल्हा परिषदेच्या २०२५=२६ या वर्षातील आरंभीची असेल ते सह एकूण महसुली जमा रुपये १६, १३,३१, १०२ इतकी असून प्रस्तावित खर्च १५ कोटी २१ लक्ष असून ९१ लक्ष ४३ हजार १०२ इतका महसुली समितीच्या अर्थसंकल्पास आदित्य जीवने बीड जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सोमवारी सदर माहिती सभागृहात दिली. यावेळी प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे यांनी जिल्हा परिषदेच्या विभागनिहाय खर्चाच्या यावेळी बाबनिहाय तरतुद सादर केली. बांधकाम विभाग दोन कोटी ४४ लक्ष




१४ हजार, शिक्षण विभाग १ कोटी ७४ लक्ष ४५०००, आरोग्य विभाग १९ लक्ष २०००, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ०१ कोटी, समाज कल्याण विभाग ०३ कोटी ५१ लक्ष १००००, महिला व बालकल्याण विभाग ७४ लक्ष ४०००, कृषी विभाग ३० लक्ष ४० हजार, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग ७४ लक्ष ३०००, वनीकरण विभाग व व्याज १०,०००, पंचायत राज कार्यक्रम विभाग ०३ कोटी ९३ लक्ष ५६ हजार, लघु पाटबंधारे विभाग १०, ४००, एकूण १५ कोटी २१ लक्ष ८८,००० रुपयाच्या प्रस्ताविक खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

यावेळी अर्थसंकल्प मांडताना मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी, ग्रामविकासासाठी बीड

(उर्वरीत पान २ वर)

## वीरशैव लिंगायत वाणी स्मशानभूमीतील समाधीची विटंबना

### विटंबना करणाऱ्या अज्ञात व्यक्तीवर तात्काळ कारवाई करण्यासाठी वीरशैव लिंगायत वाणी समाज बांधव आक्रमक तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी,पोलीस स्टेशन यांच्यासह आमदार विजयसिंह पंडित यांना दिले निवेदन



प्रतिनिधी । गेवराई

गेवराई शहरातील गोविंदवाडी रोड लगत वीरशैव लिंगायत वाणी समाजाची स्मशानभूमी असून या स्माशनभुमीमध्ये असलेल्या एका समाधीस्थळाची विंटबना झाल्याची घटना घडली आहे.या स्मशानभुमीमध्ये कै. सिध्दलींगअप्पा कोंडाअप्पा बेदरकर यांच्या समाधीची अज्ञात व्यक्ती कडुन नासधुस करून समाधी ची विटंबना करण्यात आली आहे.

या घटनेच्या अनुषंगाने आज गेवराई शहरातील वीरशैव लिंगायत वाणी समाज बांधवांनी एकत्र येऊन अज्ञात व्यक्ती विरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यासाठी व वीरशैव लिंगायत वाणी समाजाच्या स्मशानभुमी मधील समाधीसाठी सरंक्षण देण्यात यावे अशा आशयाचे निवेदन आज दि. २४ वार सोमवार रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई, पोलीस निरीक्षक गेवराई पोलीस स्टेशन,मुख्याधिकारी तथा प्रशासक नगर परिषद गेवराई तसेच गेवराई तालुक्याचे आमदार विजयसिंह पंडीत यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संबंधित व्यक्तीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी तसेच स्मशानभूमीला संरक्षण देण्यात यावे अशा प्रकारची मागणी यावेळी वीरशैव बांधवांच्या वतीने करण्यात आली. याप्रसंगी गणेशअप्पा कापसे, अनिलअप्पा शेटे, वैजिनाथअप्पा मिटकर, शाम रुकर, सुनील संभाहारे, योगेश कापसे, सुरेंद्र रुकर, रविशंकर वाडकर, दिपक कापसे,प्रवीण राजुरे, नंदकिशोर कापसे, अशोक फुलशंकर, अनिल सोसे, अमोल संभाहारे यांच्यासह गेवराई येथील सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## माजी आमदार जेथलियांकडून जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांचा सत्कार

प्रतिनिधी । मंठा

मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ए जे पाटील बोराडे यांची शिवसेनेच्या जालना जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती झाल्याबद्दल माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी त्यांचा बाजार समितीच्या सभागृहात सत्कार केला. यावेळी बाजार समितीचे संचालक अण्णासाहेब खंदारे, प्रल्हादराव बोराडे, संतोष वरकड, दिलीप चव्हाण, महादेव बाहेकर, तुळशीराम कोहीरे, भागवत बाहेकर, बंडू मोरे, पप्पू दायमा यांची उपस्थिती होती. श्री जेथलिया यांनी ए जे बोराडे यांचा सत्कार करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## फरार प्रशांत कोरटकर अखेर ताब्यात २५ फेब्रुवारीपासून होता फरार

मुंबई / प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अपमानास्पद विधान करणाऱ्या फरार प्रशांत कोरटकरला अखेर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. महाराष्ट्र पोलिसांनी त्याला तेलंगणातील मंचारियालमधून दुपारी २:४५ वाजता ताब्यात घेतले असून पोलिसा कोल्हापूरकडे रवाना झाले आहे. प्रशांत कोरटकरला उद्या कोल्हापूर न्यायालयात हजर करण्यात येणार आहे, अशी माहिती कोल्हापूरचे एसपी महेंद्र पंडीत यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अपमानास्पद विधान करणाऱ्या फरार प्रशांत कोरटकरला अखेर पोलिसांनी ताब्यात घेतले



## संपादकीय

# दु:स्वप्नाचा धडा

समस्त मानवजातीवरील अतिभीषण संकट ठरलेली करोनाची साथ आणि त्यामुळे लागू झालेल्या 'लॉकडाउन'ला पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. मागे वळूनही पाहण्याची इच्छा न होणाऱ्या या दोन वर्षांच्या कालखंडाने असंख्य दु:खद आठवणी दिल्या; त्यासोबतच जगण्यासाठी काही मोलाचे धडेही दिले आहेत. त्यामुळेच नव्या जगाशी जुळवून घेताना त्यांचे पुनरावलोकन महत्त्वाचे ठरते. चीनमधून जगभरात पसरलेल्या आणि सूक्ष्मदर्शकाशिवाय न दिसणाऱ्या या विषाणूने जगभरात ७० लाखांहून अधिक बळी घेतले. भारतात साडेचार कोटी नागरिकांना त्याची बाधा झाल्याची आणि सुमारे साडेपाच लाख बळी गेल्याची अधिकृत नोंद आहे, तर महाराष्ट्रात रुग्णसंख्या कोटीच्या घरात आणि बळींची संख्या दीड लाखांवर गेली.

करोनाच्या तीन लाटांपैकी पहिल्या लाटेत सरकार, तज्ज्ञांपासून सर्वसामान्य नागरिकांमध्येही हा आजार आणि लक्षणे-परिणामांबाबत अनामिक भीती आणि प्रचंड अज्ञान होते. याची चाहूल लागताच सरकारने 'लॉकडाउन' लागू केला. यातील निर्बंध काहीसे शिथिल होतानाच आलेल्या दुसऱ्या लाटेत करोनाने अक्राळविक्राळ रूप धारण करून साऱ्या जगालाच विळखा घातला. भारतासह अनेक देशांमध्ये या काळात प्रचंड संख्येने बळी गेले. या दिवसांत निकटवर्तीय जगाचा निरोप घेत असल्याचे दु:ख हजारोंनी अनुभवले. रुग्णालयांत जागा न मिळाल्याने उपचारांअभावी झालेले हाल दिसले; तसेच प्रतिबंधक औषधे आणि ऑक्सिजनच्या टंचाईने भलेभले हतबल झाले. एकीकडे औषधांचा काळाबाजार करणाऱ्यांचा पराकोटीचा स्वार्थ होता; तर दुसरीकडे जीवाची पर्वा न करता रुग्णांवर उपचार करणारे आरोग्यसेवक, पोलिस, स्वच्छतादूत आणि शास्त्रज्ञ अशा वेगवेगळ्या करोनायोद्ध्यांचा बाणाही विसरता येणार नाही.

रोजगाराअभावी पुण्या-मुंबईतून बिहार-उत्तर प्रदेशाकडे पायी निघालेल्या श्रमिकांचे तांडे पाहून हृदये पिळवटून निघाली; त्याच वेळी परिचित-अनोळखी व्यक्तींसाठी जेवणाची सोय करणाऱ्या, कोणी हात लावण्यास तयार नसलेल्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणाऱ्या स्वयंसेवकांच्या माणुसकीने डोळ्यांत पाणी उभे राहिले. या परिस्थितीत काही स्वयंघोषित तज्ज्ञांनी बेजबाबदारपणे 'चिकनद्वारे, वृत्तपत्रांद्वारे करोना पसरतो', 'लशी धोकादायक आहेत' असे तद्दन अवैज्ञानिक तारे तोडले. या रोगाचा भयाकारी फटका बसला, तो जगाच्या अर्थकारणाला. हजारो उद्योग बंद पडले. लाखोंनी रोजगार गमावले. अनेकांचे वेतन निम्म्यावर आले. हातावर पोट असणाऱ्यांपुढे तर जगण्याची भ्रांत निर्माण झाली. सरकारने मोफत धान्य पुरविण्यासह अर्थचक्र सुरू ठेवण्यासाठी काही योजना जाहीर केल्या; मात्र या सवलतींचा 'ओव्हरडोस' झाल्याने काही देश चलनवाढीसारख्या प्रश्नांना तोंड देत आहेत. भारतालाही त्याची झळ बसली असून विषमता आणि विकासाच्या गतीवर झालेले परिणाम आजही कमीअधिक प्रमाणात भोगावे लागत आहेत.

# बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था चाळणी झालेल्या रस्त्यांवर अजितदादा अवतरले मुखवटे घालून लक्ष्यवेधी आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी । बीड

बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था झाली असुन ठिकठिकाणी पडलेले जीवघेणे खड्डे,वाळुमिश्रित खडीचा धुराळा उडत असुन अपघातांची संख्या वाढली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे बीड शहरातील ११० कोटी रुपयांच्या ४० फुट रूदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत राज्याच्या नगरविकास विभागाकडे वर्षभरापूर्वी पाठविण्यात आलेला प्रस्ताव लालफितीत अडकला असुन त्यास तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा या प्रमुख मागणीसह धुळे ते सोलापूर रस्त्यावरील खड्डे कायमस्वरूपी बुजवुन रखडलेले दुभाजकांचे काम पूर्ण करून साईडपंखे भरण्यात यावेत. बीड ते अहिल्यानगर मार्गाचे काम संथगतीने होत असुन प्रमुख शासकीय कार्यालये असणाऱ्या रस्त्यांवर गर्दी होत असुन जलदगतीने पुर्ण करण्यात यावे या मागण्यांसाठी सामाजिक

सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२४ वार सोमवार रोजी वाजता कारंजा




टॉवर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरपरिषद बीड कार्यालय अजितदादा पवार यांचे मुखवटे घालून चाळण झालेल्या रस्त्याची पाहणी करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, मुबीन शेख,, शेख मुस्ताक, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले आदी सहभागी होते. मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.बीड नगर पालिकेने एक वर्षापूर्वी बीड शहरातील ११० कोटी रूपयांच्या ४० फुट रूदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठवलेला प्रस्ताव लालफीतीत अडकला आहे. शहरातील नगर रोड ते पालवण चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते संतोषीमाता मंदिर, राजुरी वेस -बलभीम चौक -माळीवेस , बलभीम चौक ते दगडी पुल,थिगळे कॉम्प्लेक्स ते जालना रोड, जिजामाता चौक ते मसरतनगर अशा एकुण शहरातील १७ अत्यंत महत्त्वाच्या प्रमुख रस्त्यांचा प्रस्ताव वर्षभरापूर्वी बीड नगरपालिकेने नगर विकास विभागाकडे पाठविला आहे.१७ रस्ते ४० फुट रूदीचे होणार असुन त्यासाठी ११० कोटी रुपये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेंतर्गत होणार आहेत. बीड शहरातील रस्त्यांची दुरावस्था झाली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे.शहरात वर्दळीचा असलेला छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज ते कारंजा टावर या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असुन वाळु मिश्रित खडीचा धुरळा उडत आहे. वाहनांचे अपघात होत आहेत.त्यामुळे तातडीने प्रस्ताव मंजूर करून रस्त्यांसाठी निधी देण्यात यावा.शहरातील धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बार्शी नाका ते राष्ट्रवादी भवन पर्यंत मागील अनेक वर्षांपासून मोठमोठे जीवघेणे खड्डे पडले असुन या खड्ड्यात वाहने आदळुन अपघातात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर या मार्गावरील जालना रोड वरील दुभाजकांचे काम अर्धवट असुन दुभाजकांसाठी जागा सोडण्यात आली असुन त्याठिकाणी माती टाकण्यात आली आहे.त्यामुळे रस्ता ओलांडताना वाहनांची चाके फसुन अपघाताच्या घटना घडत आहेत.तर दुसरीकडे महामार्गावरील मुख्य सिमेंट रस्त्याच्या बाजुचे साईडपंखे भरण्यात आले नसुन दुचाकी वाहनचालकांचे घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत.

बीड शहरातील मुख्य रस्ता असलेल्या बीड ते अहिल्यानगर रस्त्याची दुरावस्था झाली आहे. अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केल्यानंतर या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. मात्र काम करणाऱ्या ठेकेदार यंत्रणेने नियोजन शून्य काम केल्याने दीड वर्ष लोटूनही शहरातील दोन किलोमीटर अंतराचा रस्ता अद्याप पूर्ण झालेला नाही. बालेपीर पासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत रस्ता पूर्ण झाला असला तरी काही भागातील खड्डे ,रस्त्यांचे जोड कायमच आहेत. या ठिकाणी खडी, धुराळा उडून वाहन चालकांना त्रास होतो. या रस्त्यावर जिल्हा न्यायालय, समाज कल्याण कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, बांधकाम विभागाचे कार्यालय ,मुख्य प्रशासकीय इमारत अशी ६६ शासकीय कार्यालय असल्याने दुचाकीची वाहतूक मोठी आहे.

# यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे शनिवारी वार्षीक स्नेहसंमेलन

## कार्यक्रमास उपस्थित राहावे-विलास खाडे

प्रतिनिधी । परळी

कै.रामभाऊ आण्णा खाडे संस्थेच्या संगम फाटा दिंद्रुड येथील यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार दि. २९ एप्रिल रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले असुन या संमेलनास पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संचालक विलास खाडे व यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक वृंद यांनी केले.

यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे शनिवार दि.२९ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून बीड चे सिव्हिल सर्जन डॉ. अशोक थोरात तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव तथा कै.रामभाऊ आण्णा खाडे संस्थेचे अध्यक्ष प्रदिप खाडे व प्रमुख उपस्थितीत अबाजोगाईचे प्रचार्य विक्रम सारक, उद्योजक सुरेश नाना फड, दिंद्रुड पो.स्टे.चे एपीआय खोडेवाड, विनायक कन्स्ट्रक्शन, अंबाजोगाचे मनोज गीते, डी.बी. क्षीरसागर (सहाय्यक संचालक), श्री. दादासाहेब मुंडे (सामाजिक कार्यकर्ते), लक्ष्मण बारगजे (जिल्हा निरीक्षक) हे उपस्थितीत राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रदीप रोडे (संस्थापक प्रा. देवगिरी प्रतिष्ठान, बीड), साहेबराव बडे





(अध्यक्ष लोकशाही विद्यालय), श्री. शिवाजीराव चाटे (प्रा. यशवंतराव चाटे शिक्षण संस्था, कैज), श्री. राजाभाऊ चाटे (प्रा. राजवैभव सेवाभावी संस्था, केज), जनकराव उबाळे (पूर्व जनकल्याण सेवाभावी संस्था, सिरसाळा), अजय चाटे (गजानन विद्यालय प्रसारक मंडळ केज), अनंत धुमाळ (प्री गुरुकुल पब्लिक स्कूल. तेलगाव), बाळासाहेब राठोड (कृष्णकेसरी सेवाभावी संस्था धारूर), सचिन सानप (गणेशानंद शिक्षण संस्था) आदींची उपस्थिती लाभणार आहे.

दरम्यान वार्षिक स्नेहसंमेलन या कार्यक्रमास शिक्षणप्रेमी नागरिक, विद्यार्थी व पालक तसेच नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आपल्या स्कुलचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला. तरी आपण सह-कुटुंब सहपरिवार उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी व विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व मान्यवरांचे प्रेरणादायी मार्गदर्शन ऐकण्यासाठी आपण आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन संचालक विलास खाडे व यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक वृंद यांनी केले.

# पोलिसांनी सहा दिवसानंतर संचारबंदी पूर्णपणे उठवली

प्रतिनिधी । नागपुर



नागपुरात सोमवारी (ता. १७ ) दोन गटात उफाळून आलेल्या हिंसाचाराच्या घटनेने राज्याची उपराजधानी हादरली.या हिंसाचारात एक जणाचा मृत्यू झाला होता. २० दुचाकी, ४० चारचाकीचे आणि २ क्रेन जाळण्यात आल्या आहेत.अनेकांची घरे जाळण्यात आली होती. या हिंसाचार प्रकरणात १०५ जणांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर आता नागपूर शहरातील संचारबंदी आज दुपारी तीन वाजल्यापासून पूर्णपणे उठवली असल्याची माहिती नागपूर पोलिसांनी दिली आहे.

नागपूर शहरातील हिंसाचाराच्या घटनेनंतर शहरात संचारबंदी लागू करण्यात आली होती. त्यामुळे शहरातील बाजारपेठांमध्ये शुकशुकाट होता. हिंसाचार ग्रस्त भागात पोलीस बंदोबस्तामुळे वर्दळ थांबली होती. परंतु आता नागपूर पोलिसांनी सहा दिवसानंतर संचारबंदी उठवली असल्यामुळे शहर पूर्वपदावर येत आहे. नागपुरात बाजारपेठही सुरु झाली आहे. वर्दळ सामान्य होऊ लागली आहे. नागपूर पोलिसांनी संचारबंदी उठवली असली तरी पोलीस परिस्थितीवर पूर्णपणे लक्ष ठेवून आहेत. महाल, गांधीबाग, इतवारी या भागात नागपूर शहरातील मोठ्या आणि जुन्या होलसेल बाजारपेठ आहेत, त्या ठिकाणी पोलिसांचे लक्ष आहे. नागपुरातील संचारबंदीमुळे पहिल्याच दिवशी सुमारे २५० कोटींचा व्यापार प्रभावित झाला.

दरम्यान शहरातील संचारबंदी उठवली असली तरी काही ठिकाणी पोलीस बंदोबस्त कायम असणार आहे. संवेदनशील ठिकाणी हा बंदोबस्त असणार आहे. तसेच परिस्थिती पाहून बंदोबस्तात बदल होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# उन्हाळ्याची दाहकता वाढली; नागरिक त्रस्त

प्रतिनिधी । बीड

बीड शहरासह जिल्ह्यात कडक उन्हाळा जाणवू लागला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढू लागला आहे. थंड हवेचे ठिकाण समजल्या जाणाऱ्या महाबळेश्वरच्या तापमानात वाढ झाली आहे.जिल्ह्यातील जनजीवन होरपळून गेले आहे. जिल्ह्यात दिवसेंदिवस कडक उन्हाळा जाणवू लागला आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिक हवालदिल झाले आहेत. मे महिन्यातील उन्हाप्रमाणेच उन्हाची तिरीप लागत आहे. त्यामुळे नागरिक चांगलेच घामाघूम झाले आहेत. गेल्या १० ते १२ दिवसापासून




उन्हाच्या कडाक्याने नागरिक चांगलेच त्रस्त झाले आहेत. फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात पासूनच सूर्य तापला आहे.

उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. पहाटेच्या सुमारास वातावरणात काहीसा गारवा जाणवत आहे. मात्र सकाळी ९ वाजल्यापासूनच उन्हाचा चटका बसण्यास सुरुवात झाली आहे. सूर्य आग ओकतोय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढली असली तरी एप्रिल व मे महिन्यात आणखी उष्मा वाढण्याची शक्यता आहे. वाढत्या उन्हामुळे शेतकरीही सकाळ व सायंकाळनंतर शेतातील कामे करताना दिसत आहे. तीव्र उन्हामुळे वर्दळीच्या रस्त्यावर शुकशुकाट जाणवत आहे. रस्ते व बाजारपेठा दुपारच्या सुमारास निर्मनुष्य होत आहेत. सायंकाळनंतरच बाजार पेठेत गर्दी होताना दिसत आहे. उन्हापासून बचाव करण्यासाठी पंखे, कुलर, वातानुकूलीत यंत्रणेचा वापर वाढू लागला आहे.

बीड शहरासह जिल्ह्यातील रसंवती गृह, आईसस्क्रीम पार्लर, ज्यूस सेंटर, शितपेयांच्या दुकानावर गर्दी वाढली आहे. प्रचंड उकाड्यामुळे पंखे, वातानुकुलीत यंत्रांना मागणी वाढली आहे. कडक उन्हाळ्यामुळे भूजल पातळीतही घट झाली असून पाणी टंचाईचा प्रश्न ऐरणीवर येवू लागला आहे. जिल्ह्यात ७० हून गावे व वाड्या वस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. उन्हाळ्यापासून संरक्षण मिळावे यासाठी बाजारात विविध रंगी टोप्या, गॉगल्स, सुती रुमाल, वाळ्याच्या टोप्या विक्रीसाठी आल्या आहेत. तसेच पाणी थंड राहण्यासाठी विविध प्रकारचे माठ विक्रीसाठी आले असून त्यालाही नागरिकांमधून चांगली मागणी आहे.

पान १ वरून...

***दिंद्रुड हद्दीत स्वत:चे ...***

आपल्या पथकासह दि.२२/०३/२०२५ रोजी गुन्हयातील आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली असता गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, सदरचा प्रकार हा इसम नामे रहिम चाँद शेख रा. फुलेनगर माजलगाव याने केला आहे. त्यावरुन त्यास माजलगाव येथुन ताब्यात घेवुन गुन्हा अनुषंगाने बारकाईने विचारपुस केली असता त्याचे सांगितले की, सदर गुन्हयातील फिर्यादी सहमुद्दीन फहमुद्दीन शेख रा. फुलेनगर याने त्यास इंस्टाग्राम वरुन कॉल करुन त्याच्या मुलीची तब्यीयत खराब आहे तिच्या उपचारासाठी पैशाची गरज आहे तो मालकाचे कुलरची डिलीव्हरी देवुन कुलरचे पैसे घेवुन येणार आहे तु कारी फाटयाजवळ पाच ते सहा वाजता थांब आणी कांही इसम मला मारहाण करुन माझे डोळयात मिर्ची पावडर टाकुन माझे कडील पैसे घेवुन गेले असे त्याचे मालकाला सांगतो. असा प्लान करुन कारी फाटयाजवळ दोघांनी येवुन सहमुद्दीने शेख याने त्याचे जवळील नगदी १,३५,८००/- रु रहिम चाँद शेख यास दिले आहे. त्यानंतर पो.स्टे.दिंद्रुड येथे गुन्हा नोंद केला आहे.

सदरचा गुन्हा फिर्यादीनेच त्याचे मालकाचे कुलरचे विक्रीचे पैसे स्व:चे फायद्यासाठी चोरण्याचा बनाव करुन आरोपी रहिम चाँद शेख वय २६ वर्षे रा.फुलेनगर माजलगाव यांचे मतदीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले झालेने आरोपी रहिम शेख यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन १,३५,८००/- रु नगदी जप्त करुन पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे.दिंद्रुड यांचे ताब्यात देण्यात आले आले असुन पुढील तपास पो.स्टे.दिंद्रुड हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. नवनीत काँवत अपोलीस धीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक, बीड व पो.नि. श्री.उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विजयसिंग जोनवाल, पोउपनि महेश विग्ने, ग्रेपोउपनि हनुमान खेडकर, पोह/महेश जोगदंड, तुषार गायकवाड, जफर पठाण, पोअं/बप्पासाहेब घोडके, अश्विनकुमार सुरवसे, चापोह/ गणेश मराडे यांनी मिळुन केली आहे.

**बीड जिल्हा परिषदेचा ..**

जिल्हा परिषद कटिबद्ध असून विविध महत्वकांक्षी निर्णय घेण्यात आले आहेत ग्रामपंचायतीचे सक्षमीकरण महिलांचे सबलीकरण, शिक्षण आणि आरोग्य विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची तरतुदीसह माहिती तसादर केली. जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागाच्या उपक्रमासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

पान १ वरून...

ग्रामीण विकासाच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी आणि विकासासाठीच्या योजना राबविण्याचा अर्थसंकल्पाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे.यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी महसुली जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीचे सविस्तर वाचन करून उपस्थित विभाग प्रमुख आणि पत्रकारांना सविस्तर माहिती दिली.यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत डॉ. ज्ञानोबा मोकाटे, प्रकल्प संचालक राजेश मोराळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, प्रभारी कार्यकारी अभियंता बांधकाम (१), पशुसंवर्धन अधिकारी विजय देशमुख, आदीसह विभाग प्रमुख उपस्थित होते.

# वंडगीर येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील वंडगीर येथील मारोती मंदिर येथे प्रति वर्षा प्रमाणे याहीवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले दि.२९-०३-२०२५ रोज रविवार पासुन प्रारंभ झाला असुन ३०-०३-२०२५ रोज रविवारी सांगता आहे. वै.ह.भ.पा. धोंडापंत दादासाहेब व ह.भ.पा गुंडा महाराज चांदेगावकर यांच्या कृपा आशिर्वादाने सप्ताहास प्रारंभ होत असुन परीसरातील भाविकांनी सप्ताहात सहभाग घेऊन ज्ञान प्रसादाचा लाभ घ्यावा. अशी विनंती वंडगीर येथील गावकऱ्यांनी केली आहे.



अखंड हरिनाम सप्ताहातील कार्यक्रम - सकाळी ७ ते ९ गाथा पारायण,स. ११ ते १ भजन,दु.३ ते ५ प्रवचन ६ ते ८ हरिपाठ ,९ ते ११ किर्तन १२ ते ४ हरीजागर ,पहाटे ४ ते ६ काकडा आरती होईल .ह.भ.प. मल्लिकार्जुन महाराज हंगरगा , ह.भ.प. गणेश महाराज बावलगावकर , ह.भ.प. गणपत महाराज देशई , ह.भ.प.गणपत महाराज बामणीकर, ह.भ.प.गंगाधर महाराज वसुरकर , ह.भ.प.लक्ष्मण महाराज भेंडे गावकर, ह.भ.प.एकनाथ महाराज वंडगीरकर, आणि शेवटचे महाप्रसाद काल्याचे कीर्तन ह.भ.प निवृत्ती महाराज रावीकर यांचे कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. मृदंगाचार्य श्री ह.भ.प. चंद्रकांत महाराज पांचाळ, जळबा पाटील हंगरगा विनेकरी श्री ह.भ.प.गोविंदराव पाटील , गायनाचार्य हे.भ.प.चंद्रकांत महाराज वंडगीर, पांडुरंग महाराज , पुंडलिक महाराज देगाव, जळबा पाटील हंगरगा , तुकाराम पांचाळ ,पांडुरंग दिंडे,हे उपस्थित आहेत .या सप्ताहात सर्वांनी सहभागी होऊन भक्ती ज्ञान प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन रामराव पाटील,भारतराव कुलकर्णी, पांडुरंग करले, शेळके पाटिल यांनी केले.



# मा.आ.लक्ष्मण पवार व शिवराज पवारांच्या वतिने आयोजित इफ्तार पार्टीस उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । गेवराई

भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या वतीने सोमवार ता. २४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या रोजा इफ्तार पार्टीस मुस्लिम बांधवांनी उपस्थिती दर्शवून मोठा प्रतिसाद दिला. यावेळी युवा नेते शिवराज दादा पवार यांनी आलेल्या मुस्लिम बांधवांचे स्वागत केले.

गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल सभागृहात भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या वतीने प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. युवा नेते शिवराज पवार यांनी आलेल्या सर्व मुस्लिम बांधवांचे स्वागत केले. पवित्र रमजान महिण्यानिमित्त मुस्लिम बांधव दिवसभर उपवास पाळतात. सायंकाळी उपवास सोडण्यात येतो. भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येते. सोमवार ता. २४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या इफ्तार पार्टीस गेवराई शहरातील मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली यावेळी शहरातील मुस्लिम बांधवासह शहरातील प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार बांधव तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते



बीड - असजद अक्रम बागवान और अरिशा अक्रम बागवान इन दोनो ने अपने जिंदगी का पहिला रोजा मुकंमल किया. अल्लाह एन के रोजे को कबूल करे अमीन.

# महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेत राज्यात नववी तर बीड जिल्ह्यात शरयू ढाकणे प्रथम



प्रतिनिधी । मानुर

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र टॅलेंट सर्च या परीक्षेत राज्यात नववी तर बीड जिल्ह्यात शरयू ढाकणे प्रथम आली आहे. महाराष्ट्र टॅलेंट सर्च या परीक्षेत राज्यभरातून लाखो विद्यार्थी या परीक्षेत बसले होते. त्यातून शहरातील सक्सेस क्लासेसची विद्यार्थिनी शरयू गोविंद ढाकणे वर्ग सहावी हिने आपल्या बुध्दी कौशल्याच्या जोरावर तिने ही उत्तम कामगिरी बजावली त्याच बरोबर तिने चजच् परीक्षेत सुध्दा अनेकवेळा बीड जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे त्यामुळे पत्रकारांच्या वतीने तिचा सन्मान करण्यात आला असून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष भारतकुमार पानसंबळ, पत्रकार गोकुळ पवार, बाळकृष्ण मंगरुळकर, प्रमोद निकम तर पालक गोविंद ढाकणे सक्सेस क्लासेसची विद्यार्थिनी व संचालक अमोल सवासे, राजेंद्र लाड, अर्जुन मंडलिक

# औरंगजेब कबर परिसरात कडक प्रतिबंध; १७ सीसीटीव्हींद्वारे नजर

## पर्यटकांना फोटो काढणे, रील्स बनवण्यावर बंदी



छत्रपती संभाजीनगर - पोलिसांनी औरंगजेब कबरीबाहेर जवळपास ५० मीटर अंतरावर बॅरिकेड लावले आहेत. तेथे ये-जा करण्यासाठी एक छोटा रस्ता ठेवला आहे. पोलिसांनी औरंगजेब कबरीबाहेर जवळपास ५० मीटर अंतरावर बॅरिकेड लावले आहेत. तेथे ये-जा करण्यासाठी एक छोटा रस्ता ठेवला आहे.

औरंगजेब कबरीच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी कडक प्रतिबंध लागू केले आहेत. कबरीपासून जवळपास ५० मीटर अंतरावर बॅरिकेड लावले असून तेथे सुमारे १५ पोलिसांची नेमणूक केली आहे. ५० मीटर अंतरात ४ ठिकाणी तपासणी केली जात आहे. कबर परिसरात १७ सीसीटीव्ही आहेत. त्याचबरोबर संपूर्ण संरक्षक भिंतीवर तारेचे कुंपण लावण्यात येत आहे. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमण्यास, निदर्शने धरणे, मोर्चा, मिरवणूक काढण्यास मनाई करण्याचे आदेश रविवारी (२३ मार्च) जारी केले आहेत. यासंदर्भात पोलिस आयुक्तालयाने पत्र जारी केले आहे. तसेच कबरीच्या परिसरात पर्यटकांना मोबाइल बाहेर ठेवण्यास सक्त सूचना दिल्या जात आहेत. या परिसरात फोटो, रील्स काढण्यास बंदी घालण्यात आली आहे.

खुलताबाद येथे औरंगजेबाची कबर आहे. हिंदुत्ववादी संघटनांनी कबरीविरोधात भूमिका घेतली आहे.

### जमावबंदीचे आदेश

पोलिस आयुक्तालय हद्दीत ८ एप्रिलपर्यंत जमावबंदीसह शस्त्रबंदीचे आदेश लागू करण्याचे आदेश पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिले आहेत. येत्या काही दिवसांत येणाऱ्या सण-उत्सवाच्या काळात शहरात सामाजिक सलोखा कायम राहावा म्हणून हे आदेश जारी करण्यात आले आहेत. या काळात पाचपेक्षा अधिक लोकांना एकाच वेळी जमण्यास बंदी असणार आहे.

### आधार कार्ड नंबरची केली जाते नोंद

पोलिस प्रशासनाने कडक प्रतिबंध लागू केले आहेत. कबरीच्या दोन किमी अंतरावर पोलिसांनी मुख्य चार रस्त्यांवर बॅरिकेड लावले आहेत. या प्रत्येक ठिकाणी तपासणी केली जात आहे. कबर पाहण्यास येणाऱ्या पर्यटकांची एका रजिस्टरमध्ये नोंदणी केली जात आहे. यात नाव, कोठून आले, मोबाइल क्रमांक, आधार कार्ड किंवा पॅन कार्डची नोंद केली जात आहे. मोबाइल बाहेरच ठेवण्यास सांगितले जात आहे.

# पैशाचे सोंग करता येत नाही : अजित पवार

## पैशाचे सोंग करता येत नाही, २१०० रुपये..; लाडकी बहीण योजनेबाबत अजित पवार स्पष्टच बोलले

प्रतिनिधी । नांदेड

महायुती सरकारला विधानसभेत गेम चेंजर ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना देशभर चर्चेत आहे. आतापर्यंत अडीच कोटी महिलांना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात मात्र येत्या काळात २१०० रुपये देण्याचं आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी दिल्यानंतर या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर आर्थिक भार वाढल्याची चर्चा होती.

यावर आता राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी महत्त्वाचं वक्तव्य केलंय. मी २१०० देणार आहे. मी नाही म्हणालो नाही. मला योजना सुरू ठेवायची आहे. पण मलाही हिशोब मांडावे लागतात. सगळी सोंग करता येतात पैशाचे नाही असे अजित पवारफ्शासनाच्या तिजोरीत खडखडाट असल्याचं अनेक जण बोलतात. कृपा करून तुम्ही गैरसमज करून घेऊ नका. मी आपल्या राज्याचा सर्वात मोठा अर्थसंकल्प ७ लाख २० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केलाय. यामध्ये पेन्शन, होणारे पगार, राज्य सरकारने काढलेल्या कर्जाचा व्याज जाईल. राहिलेला पैसा माझ्या लाडक्या बहिणींसाठी आहे. विरोधक ही योजना बंद करतील असं म्हणत होते. अनेक महिला भेटल्या. त्यांनीही मला विनवलं १५०० रुपये देता २१०० रुपये द्या. मी नाही म्हटलेलं नाही. ज्यावेळेस राज्य सरकारची परिस्थिती ही अधिक योग्य होईल त्यावेळी तुम्हाला २१०० रुपये देणार. पण आता मी सगळा हिशोब केला. तुम्ही जसा तुमचा संसार करताना महिन्याचा हिशोब लावता कसा मला राज्याच्या १३ कोटी जनतेचा ३६५ दिवसाचा हिशोब लावावा लागतो.



शेतकऱ्यांना काय द्यायचं, कामगारांना काय द्यायचं, मागासवर्गीयांना काय अल्पसंख्यांकांना काय.. सगळी सोंग करता येतात पैशांची सोंग करता येत नाहीत. मला दिलेली योजना चालू ठेवायची आहे. सरकारला चालू ठेवायचे आहे. त्यामुळे यासाठी आम्ही नवीन पर्याय काढत आहोत. काही बँकांना आम्ही तयार केला आहे. जर तुम्हाला ५० हजार कर्ज काढून, एकत्र येऊन व्यवसाय करायचा आहे.. लाडक्या बहिणींमध्ये ज्या महिला या योजनेत बसतात त्यांनी एकत्र येऊन २० एक महिला आल्या तर २०गुणिले ५०००० साधारण १० लाख रुपये घेऊन तुम्ही तुमचं काम करू शकता. वीस महिलांचे घेण्याला ३० हजाराने पैसे येतील. तुमच्या व्यवसायाचा हप्ता तुम्हाला या पैशातून देता येईल. हा उपाय राज्य सरकारने आणला आहे असे अजित पवार म्हणाले. महिला बालकल्याण खात्याच्या अदिती तटकरे नाही उद्या मी हे सांगणार आहे. मराठवाड्याला चांगल्या प्रकारची तरतूद करण्याचा प्रयत्न केलेला आहे असेही ते म्हणाले.त्यामुळे घाबरण्याचं कारण नाही तिजोरीत खडखडाट आहे असे समजू नका. मी आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न करतोय असे अजित पवार म्हणाले. नांदेड मधील सभेत ते बोलत होते.

# कॉमेडियन कुणाल कामराच्या कवितेवरून राजकारण तापलं

प्रतिनिधी । मुंबई

स्टँडअप कॉमेडियन समय रैना वादानंतर कॉमेडियन कुणाल कामरा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर कुणाल कामरा याने आक्षेपार्ह कविता सादर केली. कवितेचा हा व्हिडीओ पाहून शिवसैनिकांच्या तळपायातील आग मस्तकात गेली. त्यांनी कुणाल कामराच्या सेटची तोडफोड केली.

मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल कामराने महाराष्ट्राच्या राजकारणात तीन वर्षांपूर्वी ज्या घडामोडी घडल्या त्यावर भाष्य करत एकनाथ शिंदे यांच्यावर कवितेतून निशाणा साधला. उबाठा पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी कुणाल कामराचा कविता सादर करतानाचा व्हिडीओ ट्विट केला आहे. कुणाल की कमाल. जय महाराष्ट्र, असं संजय राऊत व्हिडीओसोबत म्हणाले आहेत. त्यांच्या ट्विटला प्रत्युत्तर देत मंत्री उदय सामंत यांनी कुणाल कामरा विरोधात गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

पूर्ण गाणं ऐकून आमचे आमदार कुणाल कामरावर एफआयआर दाखल करण्याच्या मनस्थितीत आहेत. एकनाथ शिंदे यांची बदनामी करणारे ते गाणे असेल आणि अशा पद्धतीने कुणी गाणं गाणार असेल तर आम्ही आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्ते कुणीही ऐकून घेणार नाहीत. त्याच्यावर पोलिसांकडून कारवाई करण्याची मागणी करु, अशी भूमिका उदय सामंत यांनी मांडली आहे. कुणाल कामराच्या कवितेचा व्हिडीओ पाहून संतापलेल्या शिवसैनिकांनी कुणाल कामराच्या सेटची तोडफोड केली. दरम्यान या घटनेचे पडसाद विधानसभेत पडणार का हे पाहण महत्त्वाचं ठरेल.

### काय म्हणाला कुणाल कामरा ?



ह्यांचं हे राजकारण आहे. परिवारवाद संपवायचा होता, कुणाचा बाप चोरुन घेतला. काय रिप्लाय असेल? मी उद्या तेंडुलकरच्या मुलाला भेटू का की, चल भाई जेवण करुयात. तेंडुलकरचं कौतुक करतो आणि सांगतो, भाई आजपासून तो माझा बाप, असं कुणाल कामरा कविता सादर केल्यानंतर मिश्किलपणे म्हणाला.

# क्षयरोग मुक्तीसाठी बीसीजी लसीकरण सुरू

प्रतिनिधी । मुंबई

क्षयरोगाचा प्रसार रोखण्यासाठी डिसेंबर २०२४ पासून इन मुंबईतील १२ इंटरव्हेन्शनल विभागांमध्ये आयसीएमआरच्या सहकार्यान प्रौढ बीसीजी लसीकरण कार्यक्रम सुरू करण्यात आला. मार्च २०२५ पर्यंत १६ हजार ७३५ लाभार्थ्यांना बीसीजी लसीकरण देण्यात आले आहे.

जागतिक क्षयरोग दिन २०२५ वर्षासाठीचे घोषवाक्य होषा आपण टीवी निश्चित संपपू शकतोः प्रतिज्ञा करा, तरतूद करा, सेवा या है आहे. ननीकच्या काळात प्रकाशित अहवालानुसार, मुंबईमध्ये औषध प्रतिरोधक क्षयरोगाच्या उपचारांचा यशाचा दर ८० टक्के आहे, जो गेल्या आठ वर्षांत दुप्पट झाला आहे. हे गुणवत्ताधारित निदान सेवेमध्ये सातत्याने सुधारणा, नवीन औषध उपचार पद्धती आणि महापालिका आरोग्य विभागाने डिआरटीबी रुग्णांना प्रदान केलेल्या मार्गदर्शन व सहाम्यामुळे शक्य झाल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. 'टीबी मुक्त विभाग' आणि 'टीबी मुक्त मुंबई हे ध्येय साध्य करण्यासाठी टीबीमुक्त मुंबई मोहिमेंतर्गत कृती आराखडा तयार क्षयरोगाची १० प्रमुख मुक्त भारत विभागनिहाय कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणीचे निर्देश मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत.




त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाची यंत्रणा विभागनिहाय पातळीवर सज्ज झाली आहे. वर्ष २०२४ मध्ये, मुंबईमध्ये एकूण ६० हजार ६३३ क्षयरोगाचे रुग्ण आढळले, त्यापैकी ५३ हजार ६३८ भवरोगाचे रुग्ण मुंबईत वास्तव्यात होते. एकूण रुग्णांपैकी ३८ टक्के हे फुफ्फुसा व्यतिरिक्त क्षयरोगाचे रुग्ण आणि ६ टक्के बालरुग्ण होते. तर ९ टक्के हे औषध-प्रतिरोधक रुग्ण होते. केंद्रीय क्षयरोग विभागाच्या सूचना आणि राज्य सरकारच्या निर्देशांनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २६ विभागांमध्ये ७ डिसेंबर २०२४ ते २४ मार्च २०२५ पर्यंत '१०० दिवसांची मोहीम राबविण्यात आली आहे. या मोहिमेचे उद्दिष्ट समरोगाच्या रुग्णांचा शोध घेण्याचा वेग वाढवणे, भ्रषरोगामुळे होणाऱ्या मृत्युदरात घट करणे आणि नवीन रुग्ण टाळण्यासाठी क्षयरोगाचा प्रसार रोखणे हे आहे.

## उन्हाळी बाजारीच्या पिकाने शेत शिवार बहरले

# गेवराई तालुक्यातील १० महसूल मंडळांत उन्हाळी बाजारीच्या पेऱ्यात पाच टक्क्यांनी वाढ


प्रतिनिधी । गेवराई

खरिप हंगामातील कापूस व सोयाबीन पिकाची काढणी झाल्यानंतर तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रमुख अन्नधान्य पीक म्हणुन उन्हाळी बाजरीची पेरणी केली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत तालुक्यातील दहा महसूल मंडळात पाचटक्क्याने बाजरीच्या पेरणीत वाढ झाली असून मार्च महिन्यात बाजरीच्या कणीसदार पिकांने गेवराई तालुक्यातील शेतंशिवार बहरला आहे.

गेवराई तालुक्यातील गेवराई, धोंडराई, जातेगाव, तलवाडा, सिरसदेवी, पाचेगाव, मादळमोही, उमापूर, धोंडराई , चकलांबा या दहा महसूल मंडळात यावेळी जुन महिन्यात वेळेवर पाऊस पडल्यान खरिपाची पेरणी लवकर झाली. पुढे अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाल्याने उत्पादन घटल्याने शेतं लवकर मोकळे झाले. रिकाम्या झालेल्या शेतात शेतकऱ्यांनी ऊन्हाळी बाजरीचे पीक घेतले असून तालुक्यात २ हजार ३६३ हेक्टरवर बाजरीची पेरणी केली आहे. चार महिन्यांनंतर बाजरीचे पीक काढणीस येण्यास सुरुवात झाली असून एप्रीलच्या पहिल्या आठवड्यापासूनच बाजरीच्या सुगीला सुरुवात होणार आहे.

### शेतकऱ्यांनी बाजरीचे दाणे भरण्यासाठी पाणी द्यावे

बाजरीचे पीक सध्या संवेदनशील अवस्थेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कणसातील दाणे भरण्यासाठी बाजरीला पाणी द्यावे. त्याच प्रमाणे पक्षी व इतर वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करावे. यावर्षी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पेरणी केली असून पोषक वातावरण असल्याने अपेक्षीत उत्पादन मिळणार आहे.
-सतीश केसभट , मंडळ कृषी,अधिकारी गेवराई



पावसाळ्याती बाजरीचे पीक घेतले जाते परंतु पासामुळे बाजरी काळसर पडते.

# राज्यात गटशेतीचे नवीन धोरण आणू - मुख्यमंत्री

प्रतिनिधी । पुणे

महाराष्ट्रात सुरू झालेले गटशेतीची मोठी लोकचळवळ पाहता गटशेतीचे एक नवीन धोरण राज्यात आणू; गटशेती करणाऱ्यांना कशा प्रकारे मदत, योगदान देता येईल; आणि गटशेतीला लोकचळवळीचे स्वरूप कसे देता येईल अशा प्रकारचा प्रयत्न करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे आयोजित पाणी फाउंडेशनच्या 'सत्यमेव जयते' फार्मर कप- २०२४ पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. या प्रसंगी कृषीमंत्री ड. माणिकराव कोकाटे, पाणी फाऊंडेशनचे संस्थापक आमिर खान, श्रीमती किरण राव, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, प्रमुख मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ आदी उपस्थित होते.



शेती शाश्वत करायची असेल तर आपली गावे जलसमृद्ध, जलपरिपूर्ण होणे आवश्यक आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ५२ टक्के महाराष्ट्र अवर्षण प्रवण आहे, त्यामुळे जलसंधारणातूनच परिवर्तन करू शकतो. गावे पाण्याचे अंकेक्षण करणार नाहीत, त्यातील शास्त्र शिकणार नाहीत त्यात लोकसहभाग वाढणार नाही तोपर्यंत महाराष्ट्र दुष्काळीच राहील हे लक्षात घेऊन राज्य शासनाने २०१५ साठी जलयुक्त शिवार योजना सुरू करून एक लोकचळवळ सुरू केली.

## पाणी फाउंडेशन 'सत्यमेव जयते' फार्मर कप - २०२४ पुरस्कार वितरण सोहळा

त्यावेळी पाणी फाउंडेशनने लोकांमध्ये जलसंधारणाच्या कामांची चुरस निर्माण केली. तसेच या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक व्यक्तींनी पाण्याचे काम पुढे नेले. पाणी फाऊंडेशन, नाम फाऊंडेशन यांनी या चळवळीला एक लोक चळवळीचे रूप दिले. आणि महाराष्ट्रातील २० हजार गावांनी स्वतःला जलसमृद्ध केले. फक्त पाण्याचे लेखापरीक्षण करून चालणार नाही तर शेतकरी सक्षम झाला तर पाण्याचे नियोजनही तो स्वतः करू शकतो. म्हणून फार्मर कप सुरू केला.

सुरूवातीला गटशेतीअंतर्गत किमान २० शेतकरी आणि शंभर एकर जमीन असा गट तयार केल्यास एक कोटी रुपयांपर्यंत गटाला मदत दिली जात होती. ती चळवळ २०१९ नंतर थांबली होती. परंतु, अनेक गट त्यावेळी सुरू झाले.

# मस्साजोग येथील नदी खोलीकरणाच्या कामाने घेतला वेग

## ॲड. अजित देशमुख यांनी केली पाहणी



प्रतिनिधी । बीड

मस्साजोग तालुका केज येथील नदी खोलीकरणाच्या कामाने वेग घेतला आहे. नाम फाउंडेशन मार्फत हे काम चालू आहे. गेल्या काही दिवसात चांगल्या पद्धतीने काम होत आहे. या कामाची पाहणी जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित देशमुख आणि नामचे समन्वयक राजाभाऊ शेळके यांनी केली.

नदी खोलीकरणाचा हा प्रकल्प योग्य वेळेत सुरू झाल्यामुळे पावसाळ्यापूर्वी खूप मोठे काम करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शेतकऱ्यांनी देखील या कामाकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे कामाने चांगली गती घेतली असून कामाकडे लक्ष देण्यासाठी सक्षम कार्यकर्त्यांची नियुक्ती देखील करण्यात आली आहे.रविवारी या कामाची पाहणी करण्यासाठी ड. अजित देशमुख यांच्यासह राजाभाऊ शेळके, भागवत कदम, तुषार देशमुख, मंगेश देशमुख, मनोज देशमुख, बाळासाहेब देशमुख यांच्यासह अन्य शेतकऱ्यांनी भाग घेतला. चांगल्या पद्धतीने काम होत असल्याने सर्वांनी समाधान व्यक्त केले.या नदीतील गाळ निघतो तेवढा काढल्यानंतर मोठे खड्डे होतील आणि त्यात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होईल. त्यातून गाव विकासाला चालना मिळेल त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्व गावकऱ्यांनी या कामाकडे लक्ष द्यावे, असे आवाहन देखील शेळके आणि ड. देशमुख यांनी केले आहे.

# शहागड पीएम श्री जि प प्रशाला शाळेतील शिक्षकांचा अभ्यास दौरा संपन्न

प्रतिनिधी । अंबड

**तालुक्यातील शहागड येथील पीएम श्री जि प प्रशाला शाळेतील शिक्षकांचा अभ्यासदौरा यशस्वीरित्या संपन्न.जालना द्वारे आयोजित अभ्यास दौरासाठी गुजरात राज्यातील अहमदाबाद, गांधीनगर व बडोदा नर्मदा या जिल्ह्यातील विविध संस्था व शाळांचा अभ्यास दौरा नुकताच संपन्न झाला.पीएम श्री म्हणजे प्रधानमंत्री स्कूल्स फॉर रायझिंग इंडिया. प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या कल्पनेतून या शाळा देशभरात होत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यातील सर्व तरतुदी या शाळांमध्ये राबविण्यात येत आहेत. देशभरात १५ हजाराहून अधिक शाळा या निर्माण होत आहेत. या शाळाला उत्कृष्ट पायाभूत सुविधा तसेच उत्तम मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

जालना जिल्ह्यामध्ये पहिल्या टप्प्यात १२ व दुसऱ्या टप्प्यात ६ अशा एकूण १८ शाळा पीएम श्री शाळा म्हणून तयार झाल्या आहेत. या शाळांमधील सर्व शिक्षकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करून त्यासाठी निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, मुलांची सुरक्षितता, शाळेचा सुंदर परिसर, सुंदर पर्यावरण, स्वच्छ शाळा, प्लास्टिक मुक्त शाळा, विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य अशा विविध योजना तयार करून त्या शाळांमध्ये राबविण्यात येत आहेत.

या शाळा आपल्या तालुक्यातील आदर्श शाळा म्हणून उदयाला येत आहेत. या शाळांमधील शिक्षकांसाठी आता दोन अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यातील शिक्षकांसाठी राज्यांतर्गत नागपूर चंद्रपूर वर्धा या जिल्ह्यांना भेट देण्यात आले असून दुसऱ्या टप्प्यातील शाळांच्या शिक्षकांसाठी राज्याबाहेर म्हणजे गुजरात राज्यात अहमदाबाद गांधीनगर बडोदा नर्मदा या जिल्ह्यातील उत्कृष्ट शैक्षणिक संस्था व पीएम श्री शाळांना भेटी देऊन तेथील चांगल्या बाबी आपल्या शाळांमध्ये राबविण्याच्या दृष्टीने हा अभ्यास दौरा होत आहे. गुजरात शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था गांधीनगर, बडोदा, विविध पी एम श्री शाळा अशा संस्थांना भेटी देऊन त्या संस्थांचे कार्य जाणून घेण्यासाठी अभ्यास दौरा होता या अभ्यास दौर्यात अंबड तालुक्यातील शहागड येथील पीएम श्री जि प प्रशाला शाळेचे मुख्याध्यापक चक्रधर वाहुळे,शिक्षक बाळा पानसरे,दिपाली जोशी,अतिम कांबळे, राजेंद्र मनोर, महारूद्र सोलनकर, विठ्ठल वाघमारे, संदीप नरसाळे, रितेश दरगुडे, मुबारक तांबोळी, दत्तात्रय शिंदे गणेश कोरे होते या सर्व शिक्षकाना पीएम श्री जि.प प्रशाला शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्ष अशफाक शाह, उपाध्यक्ष भगवान माने यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिले







# निलेश बडूरकर यांचे ऑल इंडिया बार परीक्षेत यश

प्रतिनिधी । धर्माबाद

शहरातील हुतात्मा पानसरे हायस्कूलचे सहशिक्षक गणपत रामजी बडूरकर यांचा चिरंजीव निलेश गणपत बडूरकर याचे शिक्षण इयत्ता पाचवी ते दहावी शिक्षण हुतात्मा पानसरे हायस्कूल धर्माबाद येथे झाले. तदनंतर यांनी शासकीय विधी महाविद्यालय मुंबई येथून ऑल इंडिया बार परीक्षेत यश मिळवले त्यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. शासकीय विधी महाविद्यालय मुंबई येथून ऑल इंडिया बार परीक्षेत यशस्वीरित्या उत्तीर्ण झाला. त्याच्या यशाचे श्रेय संस्थेचे सचिव एडवोकेट विश्वनाथ पाटील बनाळीकर, संस्थेचे विश्वस्त मंडळ, सर्व संचालक मंडळ पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर, उप मुख्याध्यापक पर्यवेक्षक व सर्व शिक्षक वृंद, सौ राजश्री गणपतराव बडूरकर, ( आई वडील ) गणपती बडूरकर, ( काका ) गंगाधर सोलेवाड, ( आजोबा) माजी सरपंच, सौ मीना गजानन भूषणवाड ( मामा मामी ) राजेश मारुती चिक नेपवाड यांना देतो



प्रतिनिधी । वडवणी

बीड येथे पार पडलेल्या अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या जिल्हा मेळाव्यात वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख कराडे सुरेश यांची जिल्हा उपाध्यक्ष म्हणून सर्व शिक्षकांच्या उपस्थितीमध्ये निवड करण्यात आली. सदरील निवड राज्याध्यक्ष बसवते सर,उपाध्यक्ष हरिदास घोगरे ,राज्यसचिव कल्याण लवांडे ,जिल्हाध्यक्ष सुनील कुर्लेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत

जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.सुरेश करांडे सर हे बाहेगव्हन येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक आहेत, व वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख आहेत.त्यांचे कार्याची दखल घेऊन त्यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली.त्यांच्या निवडी बद्दल वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी माननीय बाबासाहेब उजगरे साहेब, व देवळा केंद्राचे केंद्रप्रमुख निलेश चव्हाण ,चिंचवन केंद्राचे केंद्रप्रमुख सुनील भाऊ मुंडे, पिंपरखेड केंद्राचे केंद्रप्रमुख श्री गणेश धायतीडक ,काडी वडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख प्रकाश गांडगे

# इंडियन स्मार्ट ग्रीड फोरमचा राष्ट्रीय पुरस्कार




प्रतिनिधी । मुंबई

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्यासाठी राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेसाठी इंडियन स्मार्ट ग्रीड फोरमच्या 'आयएसजीएफ इनोव्हेशन वॉर्ड २०२५' पुरस्कार सोहळ्यात देशातील सर्वाधिक कल्पक ऊर्जा प्रकल्प म्हणून डायमंड पुरस्काराने शुक्रवारी नवी दिल्ली येथे गौरविण्यात आले.अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी पुरस्कार स्वीकारला. या गौरवाबद्दल महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी कंपनीचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. पुरस्कार सोहळ्यास महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही जगातील सर्वात मोठी विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती योजना आहे. त्यासाठी राज्यात एकूण १४,९०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. त्या आधारे राज्यातील सर्व कृषी फीडर्स सौर ऊर्जेवर चालवून कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यात येणार आहेत. योजनेची अंमलबजावणी गतीने सुरू आहे. या योजनेत खासगी विकसकांकडून एकूण ६५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येत आहे व त्यातून ग्रामीण भागात ५० हजार रोजगार निर्माण होतील.

शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा आणि रात्री असा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा केला जातो. रात्री सिंचन करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे कृषी पंपांना केवळ दिवसा वीज पुरवठा करण्यात यावा अशी अनेक दशकांची मागणी आहे. कृषी पंपासाठी स्वस्तात वीज पुरवठा करण्यासाठी उद्योगांवर क्रॉस सबसिडीचा बोजा येतो व तो हटविण्याची उद्योगांची मागणी आहे. या दोन्ही समस्या सोडविण्यासाठी ही योजना मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केली आहे.

या योजनेत झालेल्या वीज खरेदी करारांनुसार सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये निर्माण झालेली वीज सरासरी ३ रुपये ८ पैसे प्रति युनिट इतक्या कमी दराने महावितरणला उपलब्ध होत आहे. परिणामी महावितरणच्या वीज खरेदी खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. महावितरणने वीजदर निश्चितीसाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या याचिकेत उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविण्याचा प्रस्ताव मांडला आहे. वीज खरेदी खर्चात मोठी बचत झाल्यामुळे सरकारला द्यावे लागणारे अनुदानही कमी होत आहे व त्यामुळे शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी मोफत वीज देणे सरकारसाठी व्यवहार्य ठरणार आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही शेतकऱ्यांना दिलासा देतानाच उद्योगांसाठीच्या वीजदरात कपात करण्यास मदत करत आहे. योजनेमुळे राज्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होत असून राज्याची रिन्युएबल एनर्जी क्षमता मोठ्या प्रमाणात वाढत आहे.



**गेल्या काही महिन्यांत बीड जिल्ह्याबद्दल बाहेर फक्त नकारात्मक गोष्टीच बोलल्या जात आहेत. लोकांना वाटतं, इथे गुन्हेगारीशिवाय काहीच घडत नाही. पण अशा गडद छायेतही काही प्रकाशकिरण असतात, आणि डॉ. विजय देवरे आणि सौ. सोनल देवरे हे त्यापैकीच एक.मुंबईतल्या या डॉक्टर दाम्पत्याने त्यांचा विवाह आनंदग्राममध्ये साजरा करण्याचा निर्णय घेतला. पंचतारांकित हॉटेल किंवा आलिशान सोहळ्याऐवजी त्यांनी समाजाने दूर केलेल्या कखत/–खऊद्ध बाधित मुलांसोबत हा मंगल क्षण साजरा करायचं ठरवलं. ज्या मुलांना कधीच कुणी लग्नाला बोलवत नाही, त्यांच्या साक्षीने विवाहबद्ध होणं – हा विचारच माणुसकी ची खरी व्याख्या. त्यांनी केवळ जिल्ह्यालाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राला एक सकारात्मक संदेश दिला.**

**हा विवाह सामान्य नव्हता, तो एक आदर्श विवाह सोहळा होता. वृक्षारोपण, ग्रंथदिंडी, विधवा महिलांच्या हस्ते औक्षण, संविधान प्रस्ताविकेचे वाचन आणि राष्ट्रगीताने सांगता – हा सोहळा म्हणजे केवळ विधी नव्हते, तर समाजाला दिलेला एक संदेश होता. आनंदग्रामच्या चिमुकल्यांनीही मनसोक्त आनंद लुटला – मेहंदी, हळद, डान्स, खेळ, हास्य आणि माया यांनी भारलेला तो दिवस आयुष्यभर लक्षात राहणारा ठरला.मागच्या वर्षी डॉ. पृथ्वीराज आणि डॉ. जागृती यांच्या विवाहात सुरू झालेली ही सुंदर परंपरा याही वेळी पाहायला मिळाली. बीडच्या बदनामीच्या बातम्या देणाऱ्यांनी अशा गोष्टींकडेही पाहायला हवं. डॉ. देवरे यांनी बीडमध्ये येऊन आनंदग्रामच्या मुलांना कुटुंबासारखं स्वीकारलं – हेच या विवाहाचं खऱ्या अर्थाने सौंदर्य आहे.**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई**

**ई-निविदा सुचना क्रमांक -एबीजे/१० सन २०२४-२५**

**शुध्दीपत्रक क्रमांक - ४**

उपरोक्त निविदा सुचनेतील कामांच्या निविदा प्रक्रियेच्या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१. ई-निविदा उपलब्ध व स्विकृती अंतिम दिनांक – दि.०७/०४/२०२५ (वेळ १८.५५ वाजेपर्यंत)

२. ई-निविदा उघडण्याचा दिनांक – दि.०९.०४.२०२५ (वेळ ११.०० वाजेपासून पुढे)

इतर तपशीलामध्ये कुठलाही बदल नाही.

टिप : १. वरील निविदा सुचनेमध्ये ०३ कामे आहेत व या निविदेप्रक्रियेची संपुर्ण माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

www.mahapwd.com
https:mahatenders.gov.in

स्वाक्षरित/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,अंबाजोगाई




# जिल्ह्यातील एकूण २०१०४ पैकी १९४५४ परीक्षार्थी यांनी दिली परीक्षा

प्रतिनिधी । बीड

केंद्रपुरस्कृत उल्लास – नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत रविवार दि.२३/०३/२०२५ रोजी आयोजित पायाभूत व संख्या ज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षेत बीड जिल्ह्यातील १९४५४ एवढया परीक्षार्थी यांनी परीक्षा दिली आहे.या बाबत सविस्तर असे की केंद्रशासनाच्या निर्देशाप्रमाणे केंद्रपुरस्कृत उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षा बीड जिल्हयामध्ये रविवार दिनांक २३ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत आयोजित करण्यात आली .त्यानुसार रविवार दि.२३/०३/२०२५ रोजी ऋङछ–ढ परीक्षा संपल्यानंतर जिल्हयातील एकूण २०१०४ चाचणीस बसण्यास पात्र परीक्षार्थी पैकी १९४५४ एवढया परीक्षार्थी यांनी परीक्षा दिली आहे. या मध्ये १८१७ परीक्षार्थी पैकी १७४६ , आष्टी तालुक्यातील २४२८ पैकी २२२६ , बीड ३२३६ पैकी ३१७३, धारूर ८५९ पैकी ८२५, गेवराई २१९५ पैकी २१९५ , केज १०६१पैकी १००६ , माजलगाव २००८ पैकी १९३६ , परळी ३०९० पैकी २९७२, पाटोदा ११९३ पैकी ११७० , शिरूर का. १३७९ पैकी १३७२, वडवणी ८३८ पैकी ८३३ परीक्षार्थींनी उपरोक्त परीक्षा दिली. बीड जिल्ह्यातील एकूण २०१०४ परीक्षार्थी पैकी १९४५४ परीक्षार्थींनी परीक्षा दिली.अशी माहिती मा.संजय पंचगल्ले ,शिक्षणाधिकारी (योजना)जिल्हा परिषद,बीड

**जाहीर प्रगटन**

**मा. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अंबड, जि. जालना यांचे न्यायालयात**
**(श्रीमती ए एम गायकवाड यांचे समक्ष) निशाणी क्र.**
**किरकोळ दिवाणी अर्थ नं:- ७२/२०२५ मीराबाई व इतर व निरंक**

अर्जदार : १) मीराबाई रामनाथ अग्रवाल, वय ७० वर्षे, धंदा घरकाम.
२) संतोष रामनाथ अग्रवाल, वय-५५ वर्ष, धंदा-व्यापार.
सर्व रा. अंबड, ता. अंबड, जि. जालना.
विरुद्ध
गैरअर्जदार :- निरंक,

विषय:- मुंबई रेग्युलेशन ॲक्ट म २ व. ७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की ज्याअर्थी अर्जदार यांनी विधीज्ञ श्री. केएन शर्मा, यांचे मार्फत सदरचा अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदा कलम २ व ७ प्रमाणे अर्जदारास वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला असून सदरील अर्जनुसार अर्जदार हे वरील ठिकाणी राहणारे आहेत तसेच मयत रामनाथ हनुमानदास अग्रवाल यांचे अर्जदार क्र १ ह्या मयताच्या पत्नी आहेत व अर्जदार क्र २ हा मुलगा आहे. मयत रामनाथ हनुमानदास अग्रवाल हे दिनांक- २० / ०८ / २०२२ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार हे मयताचे कायदेशीर मुळ वारस आहे. अर्जदाराशिवाय अन्य इतर कोणीही वारस नाही. मयत रामनाथ हनुमानदास अग्रवाल यांच्या नंतर शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच वीज जोडणी नळ जोडणी सार्वजनीक बांधकाम उपविभाग कार्यालय, तहसील कार्यालय, नगर परिषद, ग्रामपंचायत कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय अश्या सरकारी कार्यालयातील नोंदी या वारसाने अर्जदाराच्या नावे करणे असल्याने मयत याचे वारस असल्याबाबतच्या प्रमाणाची आवश्यकता आहे. करिता अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनावारे आम जनतेस कळविण्यात येते की, जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात स्वतः किंवा वकिलामार्फत आपला आक्षेप असल्यास सदर आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व कोणाचाही काही आक्षेप नादी म्हणून अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्राचा निकाल देण्यात येईल.

दिनांक १०/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**(आर एन राठोड)**
**विभाग लिपिक**

**आदेशान्वे**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर**
**अंबड जिल्हा जालना**

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# गडब ग्रामपंचायतच्या सरपंचाने गडबवासीयांच्या तोंडाला पुसली पाने

## निवडणुकीच्या अगोदर दिलेल्या आश्वासनाचा विसर!

गडब/सुरेश म्हात्रे

पेण तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायत असणाऱ्या गडब ग्रामपंचायतच्या सरपंच सै.मानसी मंगेश पाटील यांनी गडबवासीयांना निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला असून त्यांनी गडबवासीयांना दिलेल्या आश्वासनाकडे साप दुर्लक्ष केले असून याची उच्च स्तरीय चौकशी करण्यासाठी गडब ग्रामस्थ अतुर झाले आहेत.

२०२२ च्या निवडणुकीत वचननामा प्रसारण करताना गडद ग्रामपंचायतच्या सरपंचा सौ.मानसी मंगेश पाटील यांनी गडबवासीयांना मोठ्या प्रमाणात आश्वासना दिली होती त्यामध्ये प्रामुख्याने स्वच्छ पारदर्शक व भ्रष्टाचार मुक्त ग्रामपंचायत करण्यात येईल,२४ तास शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येईल, उदा,खपाचीवाडी,कारावी, सुलेवाडी तसेच गडब ग्रामपंचायतेचा काही भाग, शेती व्यवसाय व पूरक लघु व्यवसायांना चालना आई कळंबादेवी मंदिराचे सुशोभीकरण,

गडब गावाला मुख्य बाजारपेठेच्या दर्जा, गावातील जुन्या मंदिरावर सुशोभीकरण करण्यात येईल, गावात



असे क्रीडा संकुल उभा करण्यात येईल, तरुणांच्या शारीरिक विकासासाठी दरवर्षी काराव ग्रामपंचायत तर्फे क्रिकेट आणि कबड्डीचे सामन्यांचे उपाययोजना करण्यात येईल,तसेच शैक्षणिक सांस्कृतिक कार्यक्रमावर भर देण्यात येईल,आमदार व खासदार निधीतून गावासाठी निधी उपलब्ध करून देणार,गावात सुरलीत वीज पुरवठाकरता कसा करता येईल यावर भर देण्यात येईल,गावातील तरुणांना सुशिक्षित बेरोजगारांना जेएसडब्ल्यू कंपनीत कामालालावण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील,आधी मागण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.अशा अनेक खोटी आश्वासने गडबवासीयांना सौ.मानसी पाटील यांनी गडबवासीयांना दिली आहेत.



# साई मॉर्डन इंग्लिश स्कूलचा जिल्ह्यात दुसरा क्रमांक

## स्काऊट गाईड जिल्हा मेळावा संपन्न

प्रतिनिधी । बदनापुर

दिनांक २२,व २३ मार्च २०२५ दरम्यान संपन्न झालेल्या जिल्हा मेळाव्यात साई मॉर्डन इंग्लिश स्कूल ने जिल्ह्यातून दुसरा क्रमांक पटकावला असून त्यांना चार बक्षीस मिळाले १.फूड प्लाझा मध्ये प्रथम क्रमांक. २.शोभायात्रा मध्ये प्रथम क्रमांक. ३.शेकोटी कार्यक्रम मध्ये तिसरा क्रमांक.४.कौशल्य सादरीकरण मध्ये तिसरा क्रमांक. या बक्षीस पात्र शाळेचे स्काऊट गाईड विद्यार्थी व संबंधित शिक्षक आणि शिक्षिका सौ. सोनाली कऱ्हाले मॅडम तसेच श्री.कुणाल जाधव सर यांचे जिल्हा संघटक मा. पवार सर तसेच सर्व स्काऊट गाईड विभाग यांच्या तर्फे खूप खूप अभिनंदन करण्यात आले.

आणि हा मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्व शाळेचे स्काऊट गाईड शिक्षकांनी अथक परिश्रम घेतले आणि शाळेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय बळीरामजी गीते सर आणि आदरणीय गीते मॅम तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. करुणा जाधव तसेच उपमुख्याध्यापिका आफ्रिन शेख यांचे मार्गदर्शन व सहकार्याने हा मेळावा यशस्वीरित्या संपन्न झालेला आहे सर्व सदस्यांचे स्काऊट गाईड कार्यालयाच्या



# बदनापूर पोलीस ठाण्यात इफ्तार पार्टी

## आमदार नारायण कुचे व शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची उपस्थिती

प्रतिनिधी । बदनापुर

पवित्र रमजान महिन्यानिमित्त बदनापूर पोलीस ठाण्यात इफ्तार पार्टी संपन्न झाली पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात आमदार नारायण कुचे शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे नगराध्यक्ष विलास जराड उपनगराध्यक्ष शेख मतीन वस्ताद तसेच सामाजिक कार्यकर्ते तसेच मुस्लिम रोजेदार (उपवास)बांधव व सर्व धर्मीय नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते दिनांक २३ मार्च रविवार रोजी बदनापूर पोलीस ठाण्याच्या वतीने मुस्लिम धर्मीय पवित्र रमजान महिन्यानिमित्त रोजेदार( उपवास) यांच्या सन्मानात इफ्तार पार्टी आयोजित करण्यात आली होती. दरवर्षीप्रमाणे बदनापूर पोलीस ठाण्यात इफ्तार पार्टीची परंपरा कायम असून यावर्षी देखील बदनापूर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांच्या वतीने ही इफ्तार पार्टी आयोजित करण्यात आली होती. यावेळी बदनापूर चे आमदार नारायण कुचे यांनी मुस्लिम बांधवांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या तसेच मनसे जिल्हाध्यक्ष गजानन गीते यांनी देखील थोडक्यात हिंदू मुस्लिम एकता संबंधित कविता सादर केली शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी देखील यावेळी बोलताना हिंदू मुस्लिम एकतेसाठी असे कार्यक्रम घेणे गरजेचे आहे असे ते म्हणाले .या इफ्तार पार्टीत आमदार नारायण कुचे शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे नगराध्यक्ष विलास जराड, उपनगर अध्यक्ष मतीन वस्ताद ,माजी नगराध्यक्ष प्रदीप साबळे, माजी नगराध्यक्ष सत्यनारायण गिड्डा ,माजी उपनगराध्यक्ष समीर शेख गुड्डू, नगरसेवक सुभाष मगरे, नगरसेवक सय्यद इम्रान नगरसेवक शेख मुस्ताक, पत्रकार आनंद इंदाणी, किशोर सिरसाठ, सय्यद सिकंदर, सय्यद रफिक भाई,संजय भुजाळ, पोलीस उपनिरीक्षक दिलीप चवरे, संतोष सावंत,या सह राजेंद्र तापडिया, पप्पू दादा कुलकर्णी,रवि वाहुळे सह सर्व धर्मीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढ मागणीसाठी आझाद मैदानात

प्रतिनिधी । मुंबई

राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव अनुदानाच्या टप्प्यासाठी निधीची तरतूद करा या मागणीसाठी राज्यातील शिक्षकांनी आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले. परंतु आपल्या हक्काच्या वेतनासाठी सातत्याने आंदोलन करून ही सरकारला कसलीच जाग येत नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या महिला शिक्षिकांनी अंगावर रॉकेल ओतून घेत स्वतःला जाळून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. या घटनेने आझाद मैदान परिसरात एकच खळबळ उडाली.

राज्यातील अंशतः अनुदानित, विनाअनुदानित त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा व मूल्यांकनास पात्र असलेल्या शाळांचे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आझाद मैदानावर आपल्या न्याय हक्कासाठी आंदोलन करीत आहेत. परंतु

## महिला शिक्षकांचा आत्मदहनाचा प्रयत्न; पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे अनर्थ टळला



सातत्याने आंदोलन करून आपल्या हक्काच्या मागण्या शासनापुढे मांडून देखील शासन आपल्या मागण्या पूर्ण करत नाहीत. आम्ही सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असतानाही सरकार आमच्या मागण्याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार करत नाही त्यामुळे आझाद मैदानात आंदोलन करणाऱ्या शिक्षकवृंदात संतापाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी तीव्र संतापलेल्या गावंडे मॅडम आणि साळवी मॅडम या दोन्ही मॅडम दोन महिला शिक्षिकांनी काल दिनांक २४ मार्च २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजण्याच्या सुमारास आझाद मैदानात स्वतःच्या अंगावरती रॉकेल ओतून स्वतःला जाळून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेने आझाद मैदान परिसरात एकच खळबळ उडाली. दरम्यान सदर घटनेची माहिती मिळताच शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत सर्व प्रकारची माहिती घेतली. यावेळी जीवाचं बरं वाईट करू नका किंवा आत्मदहना सारख्या मार्ग अवलंबून आपलं जीवन संपवू नका. शांततेच्या मार्गाने आपल्या मागण्या सरकारकडे मांडू. सरकार निश्चितच आपल्या मागण्या पूर्ण करेल असा विश्वास यावेळी शिक्षक आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी व्यक्त करत कोणत्याही शिक्षकांनी चुकीचं पाऊल उचलू नये असे आवाहन आंदोलनकर्त्यां शिक्षकांना केले.

# शहर विकासाच्या आड मनपाच्या टीपीची किड!

## पालकमंत्री विखे पाटलांनी स्वतंत्र बैठक घेण्याची गरज । आ. जगताप यांच्या विरोधात जनमत तयार करण्याची 'टीपी'तील काहींनी सुपारी घेतलीय!

'टीपी'ची भाड खाणारी 'टोपी'/ उत्तरार्ध । प्रशांत बाफना

नगर शहराच्या सर्वांगिण विकासासाठी झोकून देत अहोरात्र मेहनत आणि काम करणाऱ्या आ. संग्राम जगताप यांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून अनेक योजना आणि कामे आणली. त्यातूनच त्यांची लोकप्रियता वाढीस लागली असताना महापालिकेतील नगर रचना विभाग अर्थात टीपीतील काही कर्मचाऱ्यांनी नगरकरांच्या खिशावर राजरोसपणे दरोडे टाकणे चालू केल्याचे लपून राहिलेले नाही. यातील काहींची अपसंपदा कोटीच्या घरात गेल्याने त्यांची लाचलुचपतकडून चौकशीही झाली. तरीही त्यांच्यावर महापालिका प्रशासन मेहेरबान! आ. जगताप यांचा महापालिकेत थेट संबंध नसला तरी नगर शहराचे ते पालकमंत्रीच आहेत. त्यांच्या इशाऱ्याशिवाय मनपातील एकही फाईल हालत नाही. त्यामुळेच टीपीमधील ही दरोडेखोरी आ. जगताप यांच्याबद्दल संशय निर्माण करणारी ठरली असल्याने त्यांनी यात वेळीच लक्ष घालण्याची गरज आहे. विरोधी जनमत तयार करण्यात हाच टीपी विभाग सध्या सुपारी घेतल्यागत काम करत असून त्याचे परिणाम येत्या महापालिका निवडणुकीत दिसल्यास आश्चर्य वाटू नये! पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे असोसिएशनने तक्रार केली असून याबाबत त्यांनीही दखल घेण्याची गरज आहे.

तीनशे चौरस मीटरपर्यंतच्या परवानगीचा अधिकार का ठेवलाय दाबून ?शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार आणि काढलेल्या आदेशातील विकास नियंत्रण नियमावलीनुसार आर्किटेक व अभियंत्यांना तीनशे स्क्वेअर मीटर पर्यंत परवानगी देण्याची तरतूद आहे. तसे अधिकार त्यांना विकास नियंत्रण नियमावली मध्ये देण्यात आलेले आहेत. त्यानुसार परवानगीसाठी आर्किटेक इंजिनियर्स व सर्वे असोसिएशन गेली चार वर्षे प्रयत्न करत आहे. मात्र, त्याची कोणतीही दखल घेतली जात नाही. तीनशे मीटरपर्यंतचे अधिकार आर्किटेक आणि अभियंत्यांना दिले तर महापालिकेतील नॉन टेक्नीकल स्टाफ आणि त्यांना मिळणारी 'मलई' बंद होणार! प्रकरणे प्रलंबीत ठेवून परवानगी देण्याचे टाळताना प्रत्येक टेबलवर मिळणारी पंधरा- वीस हजारांची मलई बंद होणार असल्यानेच महापालिका हे अधिकार दाबून ठेवत असल्याची चर्चा आहे. आयुक्त साहेब, पेंडन्सी नको असेल तर हे अधिकार तुमच्या कर्मचारी- अधिकाऱ्यांकडे कशाला ठेवताय तुम्ही? पेंडन्सीची काळजी मनापासून असेल तर हे अधिकार दिले पाहिजेत आणि नगरकरांची रोज होणारी आर्थिक लूट थांबविली पाहिजे.

# सावळदबारा -टिटवी रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले

सावळदबारा ।प्रतिनिधी

सावळदबारा -टिटवी रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत हे खड्डे मोठ मोठे होत आहेत या खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहेत संबंधित विभागाने यांकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी व वाहनधारक करित आहेत.टिटवी रोडवरील खड्डे मोठ मोठे होत आहेत त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनधारकना गाडी चालवाताना अवघड होत आहेत.टिटवी गावापासून चढ पर्यत रोडवर चढताना मोठमोठे खड्डे असल्यामुळे गाडी चालवताना मोठी अडचण निर्माण होत आहेत रस्त्यावर खड्डेच खड्डे पडल्याने गिट्टी बाहेर आली आहेत गाडी चालवणे अवघड झाले आहेत मोठमोठे खड्डे होत असल्याने वाहनधारकांच्या गाडी या खड्डे मध्ये आदळत आहेत सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामीचे मंदिर आहेत दर्शन घेण्यासाठी भाविक भक्त सावळदबारा येथे येतात याच रस्त्यावरून ये जा करतात.टिटवी रोडवर हे खड्डे मोठमोठे होत आहेत आणि त्यातील गिट्टी बाहेर आली आहेत वाहनधारकांना गाडी चालवणे या रस्त्यावर अवघड झाले आहेत टिटवी येथील ग्रामस्थांना कामानिमित्त सावळदबारा येथे दररोज ये जा करावी लागते. टिटवी गावापासुन चढ पर्यत रोडवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत गिट्टी बाहेर आली आहेत गाडी खड्डे मध्ये आदळत आहेत चढ वर वाहनधारकाना गाडी चालविणे अवघड होत आहेत मोठमोठे खड्डे असल्यामुळे वाहनधारकांना त्या ठिकाणी गाडी चालवताना अवघड होत आहेत टिटवी या रस्त्यावर खड्डे पडले हे खड्डे मोठमोठे होत आहे संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते, व वाहनधारक करीत आहेत



# आक्का आम्हालाही दाखवाना.... !
# तुमच्या लाडक्या खोक्या विठ्ठलाची पंढरी....!!

प्रतिनिधी । बीड

वन्य प्राण्यांची राजरोस हत्या करणे, ग्रामीण लोकांची आर्थिक लूट करणे, विरोध करणाऱ्या नागरिकांवर प्राणघातक हल्ला करणे, वन जमिनीवर अतिक्रमण करणे या सारख्या समाजद्रोही घटनेत आरोपी असणाऱ्या तथाकथित भाजपा कार्यकर्ता सतीश भोसले उर्फ खोक्याच्या पापाचे घडे भरले व त्याला गजाआड करण्यात आल्याने पॅन्ट शर्ट मधील तथाकथित कागदोपत्री आदिवासी कार्यकर्त्यांनी आणि त्याच्या आक्काने खोक्याला आमचा विठ्ठल असल्याचे संबोधून तो एक थोर महात्मा असल्याचा कांगावा केला जाऊ लागल्याने 'भक्त पुंडलिकांसाठी... उभा राहिला विटेवरी... धनी आम्हालाही दाखवाना... विठुरायाची पंढरी'... या भक्ती गीताच्या ओळी ऐवजी 'आदिवासी आक्का खोक्याला विठ्ठल समजुनी... उभा राहिला एका शिकाऱ्याच्या पाठीशी... आक्का आम्हालाही दाखवाना.... तुमच्या लाडक्या खोक्या विठ्ठलाची पंढरी.... अशा ओळी लोकांत गुनगुणल्या जाऊ लागल्या आहेत.

शिरूर कासार तालुक्यातील बावी येथील ढाकणे पिता-पुत्रांनी वन्य प्राण्यांच्या शिकारीला विरोध केल्यामुळे त्यांच्या वर प्राणघातक हल्ला करणाऱ्या भारतीय जनता पार्टीचा तथाकथित कार्यकर्ता आणि आष्टी पाटोदा शिरूरच्या लोकप्रिय नेत्याचा जिवलग कार्यकर्ता सतीश भोसले उर्फ खोक्याने व त्याच्या साथीदारांनी ढाकणे पिता पुत्रास जबर मारहाण करून अपंग केल्याच्या घटनेची बोंबाबोंब झाल्याने खोक्याच्या गुंडगिरी विरोधात जन असंतोष निर्माण झाला .पोलीस प्रशासनाने खोक्याच्या मुसक्या आवळल्याने त्याच्या समर्थनार्थ रस्त्यावर पॅन्ट शर्ट व सुटा बुटातील कागदोपत्री आदिवासी कार्यकर्त्यांनी आणि त्याच्या आक्काने खोक्या एक सामाजिक महात्मा आहे तो आदिवासींचा विठ्ठल असल्याचे संबोधून त्याच्या अमानवी कर्तुत्वाचे समर्थन केल्याने अहिंसक मानवी भावना असणाऱ्या नागरिकांत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. खोक्याच्या या क्रु कर्तुत्वाचे समर्थन करून त्याला आदिवासींचा विठ्ठल संबोधणाऱ्या पॅन्ट शर्ट व सुटाबुटातील कागदोपत्री आदिवासी कार्यकर्त्यांच्या आणि आकाच्या भूमिका बद्दल नागरिकात आश्चर्य व्यक्त केले जाऊ लागले आहे .आदिवासी कार्यकर्त्यांकडून आणि अन्य लोकांकडून खोक्याची पाठराखण करून त्याच्या पाठीशी उभा असल्याचे चित्र निर्माण करणाऱ्या या नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या भूमिका पाहता ,'भक्त पुंडलिकासाठी... उभा राहिला विटेवरी.... धनी मलाही दाखवाना... विठुरायाची पंढरी'.... या भक्ती गीता ऐवजी 'पॅन्ट शर्ट आणि सुटाबुटातील आदिवासी आणि आक्का खोक्याला विठ्ठल समजुनी... उभा राहिला शिकारी खोक्याच्या पाठीशी.... आक्का आम्हालाही दाखवाना.... तुमच्या लाडक्या खोक्या विठ्ठलाची पंढरी '.....असे उपरोधक ओळी लोक गुनगुणू लागले आहेत.

# ढासळत्या सामाजिक व्यवस्थेला सावरण्यासाठी लेखकांनी पुढे यावे - साहित्यिक अनंत कराड

अहिल्यानगर (प्रशांत बाफना)

जाती-धर्म भेद, भाषावाद, प्रांतवाद, भ्रष्टाचार या बाबी सामाजिक पर्यायाने राष्ट्राची प्रगती रोखण्याचे काम करतात. परंतु दुर्दैवाने या सर्वच गोष्टी समाजात वेगाने फोफावत चालल्या असून त्याला वेळीच पायबंद घातला नाही तर मानवजातीचे मोठे नुकसान होऊ शकते. हे टाळायचे असेल कवी, लेखक, पत्रकार यांनी आपल्या लेखणीद्वारे समाजाला वास्तवाचे भान करून द्यायला हवे असे प्रतिपादन म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा एकता फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड यांनी केले. कवी बाळासाहेब नागरगोजे लिखित 'युद्ध पेटले आहे' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभात ते विशेष अतिथी म्हणून बोलत होते. सुप्रसिद्ध लेखिका ललिता गादगे यांच्या हस्ते काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ.सुधाकर शेंडगे होते. व्यासपीठावर प्रा.डॉ.विरा राठोड, प्रा.डॉ.जयपालसिंह शिंदे, डॉ.रामदास नागरगोजे, एकता फाउंडेशन चे



सचिव पत्रकार गोकुळ पवार यांची उपस्थिती होती.शहिद भगतसिंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि.२३ मार्च रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शाहीर डॉ.समाधान इंगळे आणि शाहीर अमरजित बाहेती यांच्या क्रांतिकारी गीतांनी कार्यक्रमाची सुरुवात झाली. 'युद्ध पेटले आहे' या काव्यसंग्रहावर भाष्य करतांना डॉ.विरा राठोड यांनी बाळासाहेब नागरगोजे यांच्या हातून उत्कृष्ट रचनांची निर्मिती झाल्याबद्दल कवीचे तोंड भरून कौतुक केले. तसेच, ललिता गादगे, डॉ.जयपालसिंह शिंदे, डॉ.सुधाकर शेंडगे यांनीही काव्यसंग्रहाची बलस्थाने विस्ताराने विषद केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवीवर्य बाळासाहेब नागरगोजे यांनी केले तर बहारदार सूत्रसंचालन करत डॉ.समाधान इंगळे यांनी कार्यक्रम एका उंचीवर नेऊन ठेवला.

एकता फाउंडेशन आणि प्रगतीशील लेखक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुस्तक प्रकाशन सोहळ्यात लेखक संघाचे राजकुमार कदम, एकता फाउंडेशन चे शिवलिंग परळकर, शिवचरित्रकार कैलास तुपे, व्यंगचित्रकार सुहास पालिमकर, परशुराम सोंडगे, अशोक अवंतकर, अंकुश नागरगोजे, एड.विशाल मस्के, माया दिवाण, संगीता सपकाळ-कदम यांच्यासह शिक्षक, वकील, डॉक्टर, पत्रकार, लेखक, कवी, कवयित्रींसोबतच नागरगोजे यांचे नातेवाईक आणि मित्रपरिवार यांची बहुसंखेने उपस्थिती होती.

# सर्व जिल्हा परिषद शाळांना सौरविद्युत देणार

## सीईओंचा प्रहारच्या मागणीवर मोठा निर्णय - जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद शाळांची विद्युत देयके भरण्यासाठी शासनाने स्वतंत्र निधी उपलब्ध करून न दिल्याने बीड जिल्ह्यातील जवळपास सर्वच शाळांची विद्युत देयके थकित आहेत. परिणामी शाळांची विद्युत जोडणी खंडित केली जाऊ शकते.यामुळे जिल्हा परिषद बीड चे कर्तव्यदक्ष सीईओ आदित्यजी जीवने यांची प्रहार शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीडचे अध्यक्ष धनंजय कुलकर्णी व सरचिटणीस अविनाश काळे यांनी भेट घेऊन याबाबत निवेदन देऊन,सदरील





बिले १५ व्या वित्त आयोगातुन भरण्यासाठी आदेश देण्याची विनंती केली आहे.

सदरील भेटीत विद्युत जोडणी अभावी सीईओ साहेबांनी आखलेल्या मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान वर ई लर्निंग अभावी योग्य परिणाम निष्पन्न होण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.ही बाब लक्षात घेऊन सीईओ साहेबांनी जिल्हा परिषद बीडमधील शाळांची कायमस्वरूपी विद्युतची सोय व्हावी यासाठी सर्व जिल्हा परिषद शाळांना लवकरच साधारण दहा कोटी रूपये पर्यंत खर्च करून सौर विद्युत सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासितकेले आहे.या चर्चेत सीईओ साहेबांनी यंत्रणेला या बाबत तातडीने आदेश देखील दिले आहेत. यामुळे जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढी साठी मोठी मदत होणार असल्याने शिक्षक बांधवांत आनंदाचे वातावरण असून समस्त शिक्षक बांधवांच्या वतीने प्रहार संघटना सीईओ साहेब यांचे मनःपूर्वक ऋण व्यक्त करत आहे.

यात्रसंगी प्रहार शिष्ट मंडळात सर्वश्री उर्दू विभाग प्रमुख मिर्झा हसनात,पेन्शनर सेल प्रमुख सुरेश प्रधान व राजेसाहेब चव्हाण, आरोग्य विभाग प्रमुख गोविंद गोचडे,बीड तालुका,अध्यक्ष सय्यद जिलानी,गेवराई तालुका अध्यक्ष बाळासाहेब गावडे,संपर्कप्रमुख शहादेव मराठे,कोषाध्यक्ष उत्तरेश्वर बजगुडे, बाळासाहेब वाघुले, अंबादास बागलाने,केज तालुका अध्यक्ष प्रभूकांत सोन्ने,जिल्हा संघटक सुरेश वाघमारे,सहसचिव महेश भट,कार्याध्यक्ष श्रीकृष्ण जोशी,प्रवक्त्या निर्मला वाघमारे,प्रविणा कांबळे

# संगीत साधना मंचची संगीत सभा उत्साहात




अंबाजोगाई (प्रतिनिधी)

संगीत साधना मंचच्या वतीने मराठवाड्यातील गायिका सध्या पुणे स्थित स्वरेशा पोरे (कुलकर्णी) यांची गायन सभा रविवारी उत्साहात संपन्न झाली. दुसऱ्या प्रहरात संपन्न झालेल्या समय चक्रा नुसार राग ऐकण्याची या सभेत सुरुवातीला स्वरेशा पोरे यांनी सकाळच्या दुसऱ्या प्रहरातील राग नटभैरव विलंबित एकतालातील, समझत नही या बंदिशीने आपल्या गायनाची सुरुवात केली यानंतर नाचत नटराज या द्रुत तीन तालातील बंदीशीने रसिकांची मने वेधून घेतली . यानंतर स्वरेशा पोरे यांनी पंडित सी. आर.व्यास रचित राग बिलासखानी तोडी मधील त्यज रे अभिमान,जान गुनियन सो ' ही सर्व परिचय बंदिश सादर केली. यानंतर दृत एकतलातील जागत तोरे कारण बलमा अनोखी बंदी सादर केली या बंदीची वैशिष्ट्य म्हणजे, अस्थाई एक तालाच्या वजनाने जात होती आणि अंतरा मात्र तिनतालाच्या वजनाने जाऊन परत एकदा एक तालाच्या वजनाला भिडत होता., ही तालाची समज, रसिकांना सौ.स्वरेशा पोरे यांनी समजावून सांगितली आणि लिलाया करूनही दाखवली. यानंतर प्राणेश पोरे रचित गिनत हारे ' या अर्थपूर्ण आणि अप्रतिम बंदिशीने, समस्त रसिकांच्या मनाचा ठाव घेतला.यानंतर समर्थ रामदास रचित तानी स्वर रंगवावा 'या अभंगाने संगीत सभेची सांगता झाली.संवादिनीवर विश्वजीत धाट तर तबल्यावर रत्नदीप शिगे यांनी साथसंगत केली. सभेच्या रंजकतेचा चढता आलेख उपस्थित रसिकांनी अनुभवला.

# पोलीस नागरिकांच्या संरक्षणासाठी की लुटण्यासाठी ? ; आमदार जगताप यांचा सवाल

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

शहरातील कोतवाली व तोफखाना पोलीस स्टेशन हद्दीमध्ये चोऱ्या दरोडे महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र ओढण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढले आहे पूर्वीच्या काळामध्ये पोलीस गस्त घालायचे नागरिकांना भेटायचे चौकात असणाऱ्या वहीवर नोंद करायचे, काही अनुचित घटना घडल्यानंतर तातडीने बीट मार्शल घटनास्थळी जायचे. मात्र आता पोलिसांची कुठली यंत्रणा राहिली नाही त्यामुळे नागरिकांच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे तरी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी तातडीने लक्ष घालून घडलेल्या घटनांचा तपास तातडीने लावून गुन्हेगार व चोरांवरपोलिसांचा धाक निर्माण करावा अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांनी केली.

बुरुडगाव रोड वरील साईनगर भागात होणाऱ्या चोऱ्यांचा व दरोड्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्याकडे नागरिकांनी निवेदनद्वारे केली यावेळी आ.संग्राम जगताप, मा.उपमहापौर गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, डॉ.महेश वीर, राजेश भंडारी, आदेश चंगेडिया, योगेश चंगेडिया, राजेंद्र बलदोटा, सतीश देसरडा, राजेंद्र मुथा, बाबुशेठ बोरा,



संजय राका, डॉ.मुकुंद खासे, संदेश कटारिया, पंकज पटेल, समीर मुथा, रवींद्र शेलोत, अभय लुनिया आदी सह नागरिक उपस्थित होते.

आ.संग्राम जगताप पुढे म्हणाले की शहर पूर्वी ११ वाजता बंद केले जायचे! मात्र आता नाईटला परवानगी दिली काय? असा प्रश्न आम्हाला पडला आहे. रात्री तीन ते चार वाजेपर्यंत शहरांमध्ये वर्दळ दिसती काही वेगळ्या विचाराचे लोक बस स्थानकावर फिरत असतात यांचे काय काम असते? हे कुठल्यातरी वेगळ्या भागात राहत असतात हेच खरे दरोडेखोर आहे' पोलिसांनी यांच्या गाडीचे कागदपत्र तपसली पाहिजेत बिगर नंबर प्लेटच्या गाड्यावर फिरत असतात. पोलिसांनी यांना तपासले पाहिजे, शहरात गस्त वाढवली पाहिजे, जे पोलीस स्टेशनचे प्रमुख अधिकारी आहेत यांच्या

भवताली जे कर्मचारी गोळा झाले आहे ते फक्त अवैद्य धंद्याशी संपर्क असणारी लोक आहे. यांचे पुरावे आमच्याकडे आहेत पीआय लोकांना जेवायला घेऊन जातात आणि तिथे डिलिंग करतात अशी माहिती पोलीस अधीक्षकांना सांगितली असून त्या कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

# पेन्शनधारक ज्येष्ठांनी बिगर पेन्शन ज्येष्ठांसाठी आशेचा किरण बनावे- प्राचार्य डॉ.दामोदर थोरात

केज/प्रतिनिधी

केज येथे ज्येष्ठ नागरिक संघाच्या मेळाव्यात योगेश्वरी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.दामोदर थोरात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना त्यांनी वरिल उद्गार काढले.ज्येष्ठ नागरिक संघ केज शाखेच्या वतीने ज्येष्ठां साठी चालण्याच्या स्पर्धेचे बक्षीस वितरण तसेच संघातील ज्येष्ठांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ज्येष्ठांचा मेळावा स्वामी विवेकानंद विद्या मंदिर केजच्या सभागृहात आयोजित करण्यातआला होता.या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक केज शाखेचे अध्यक्ष अड.राजेसाहेब देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. दामोदर थोरात,विभागीय अध्यक्ष,अड.अनंतराव जगतकर अध्यक्ष, अंबाजोगाई ज्येष्ठनागरिक संघ,श्रीमती कमलताई बरुळे,श्रीमती मंगलताई भुसा,श्रीमती डॉ.सुलभा खेडगीकर ह्या उपस्थित होत्या.आपल्या विस्तारित भाषणात प्राचार्य डॉ. थोरात यांनी ज्येष्ठांनी एकांतात कुढत बसण्या ऐवजी चारचौघात सहभागी होऊन आनंदी जीवन जगावे असासल्ला दिला.ज्येष्ठ नागरिक संघ केजचे कोषाध्यक्ष तथा आधारस्तंभ श्री.रामेश्वर जी जाजू,सचिव श्री. गिन्यानदेव गदळे,सह सचिव श्री.धोंडीराम साखरे यांनी ज्येष्ठांच्या मेळाव्याचे आयोजन केले होते.

चालण्याच्या स्पर्धेत पहिल्या गटातुन पहिले बक्षीस प्रा.हनुमंत भोसले, दुसरे श्री.हरिदास भांगे




तर तिसरे श्री.जीवनराव थोरात यांनी मिळविले. दुसऱ्या गटातुन प्रथम क्रमांक श्री.हनुमंत बोरडे, दुसरे श्री.लक्ष्मण यादव तर तिसरे श्री.जंबुराव खडबडे यांनी मिळविला बक्षीसाचे स्वरूप स्मृती चिन्ह,शाल आणि पुष्प गुच्छ असे होते.बक्षीसाचा सर्व खर्च स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज या शिक्षण संस्थने केला.या मेळाव्या मध्ये अड.विजयकुमार कुलकर्णी,श्री.वासुदेवराव डोंगरे,श्री.मधुकर मोरे, श्री.लक्ष्मणराव यादव आणि श्रीमती केंद्रे यांना वाढदिवसाचे औचित्य साधुन त्यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. या मेळाव्यात अड.अनंत राव जगतकर,नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड श्री. मारोती घुले,श्री. ओमप्रकाश भन्साळी आदी मान्यवरांनी आपले विचार मांडले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.गिन्यानदेव गदळे यांनी केले तर आभार सेवानिवृत्त प्राचार्य श्री.लक्ष्मणराव जाधव यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सेवानिवृत्त शिक्षक तथा लेखक श्री.हनुमंत घाडगे यांनी केले.कार्यक्रमाची सुरुवात साने गुरुजींच्या खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने तर समारोप राष्ट्रगीताने झाला. कार्यक्रमाला अनेक ज्येष्ठ महिला,पुरुष,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या संजीवन समाधी महोत्सवाचे २९ आणि ३० मार्च रोजी आयोजन

आष्टी (प्रतिनिधी)

बीड, नगरसह महाराष्ट्रातील अनेक भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आष्टी तालुक्यातील सावरगाव नजीकच्या मच्छिंद्रनाथ देवस्थान (मायंबा) समाधी महोत्सवाचे २९ आणि ३० मार्च रोजी आयोजन करण्यात आले आहे. गर्भगिरीच्या पर्वत रांगेतील आष्टी आणि पाथर्डी तालुक्याच्या हद्दीवर मच्छिंद्रनाथ मायंबा हे देवस्थान आहे. या ठिकाणी राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येत असतात. दरवर्षी गुढीपाडव्याला येथे मोठी यात्रा भरते. त्याच्या आधी संजीवन समाधी महोत्सवामध्ये विविध उपक्रमास सुरुवात होते. यावर्षी मंगळवार दिनांक २५ मार्चपासून हा महोत्सव सुरू होत असून या दिवशी निशाण दिंडीचे मच्छिंद्रनाथ गडाहून पैठण कडे प्रस्थान होईल. २९ मार्च रोजी पैठण येथे निशान मिरवणूक




होईल. तेथून कावडीसह गडाकडे भाविक प्रस्थान करतील. २९ मार्च रोजी निशान आणि कावडीचे मच्छिंद्रगड येथे आगमन होईल. आधी महाआरती होईल त्यानंतर दुपारी दीड ते सायंकाळी चार या वेळेत विविध ठिकाणाहून कावडीने आणलेल्या गंगाजलाने समाधीस अभिषेक केला जाईल. सायंकाळी चार ते पहाटे साडेपाच या वेळेत समाधीस उटणे, चंदन लेप लावणे हा कार्यक्रम पार पडेल. मागील वर्षी मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने रात्री बारा ऐवजी हा चंदन लेप लावण्याचा कार्यक्रमाची वेळ सायंकाळी चार पासून वाढवण्यात आली आहे. त्यानंतर रविवार दिनांक ३० मार्च रोजी पहाटे साडेपाच वाजता समाधीची विधीवत महापूजा केली जाईल. त्यानंतर आरती होईल आणि नियमित दर्शन सुरू होईल अशी माहिती मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या वतीने देण्यात आली आहे.आष्टी तालुक्यातील सावरगाव येथे संपूर्ण जगामध्ये एकमेव अशी मच्छिंद्रनाथांची एकमेव संजीवन समाधी असून गेल्यावर्षी दर्शन रांगेमध्ये प्रचंड अडचणी आल्या होत्या. काही त्रुटी राहिल्या होत्या. त्या त्रुटी यावर्षी आम्ही सर्व सुधारल्या आहेत. आजपर्यंत सायंकाळी सात वाजता समाधी उघडी करून दर्शन सुरू होत होते मात्र यावर्षी सकाळी दहा वाजता कावडी येतील, दुपारी साडेबारा वाजता आरती होईल. एक वाजेपर्यंत उटणे काढणे कार्यक्रम. दुपारी एक ते चार कावडीने आणलेले पाणी घालणे व चार वाजता उटणे (लेप) लावणे कार्यक्रम सुरू होणार असून दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजेपर्यंत समाधी दर्शन सुरू राहील हा बदल वाढत्या गर्दीमुळे करण्यात आला आहे.

# वाण धरणातील व अंबलवाडी धरणातील पाणी नदीपात्रात सोडा-फुलचंदभाऊ कराड

परळी (प्रतिनिधी)

परळी तालुक्यातील वाण धरणात पुरेसा पाणीसाठा आहे. वाण अंबलवाडी धरणातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवून वाण नदीपात्रात सोडावे, जेणे करुन परिसरातील शेतकरी बांधवांच्या जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय होईल, प्रशासनाने लवकरात लवकर वाण धरणाचे पाणी नदीपात्रात सोडावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे जेष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती व वाणधरण शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष फुलचंद भाऊ कराड यांनी केली आहे.

परळी तालुक्यातील नागापूर येथील वाण धरणाखालील व नदीपात्राच्या दोन्ही बाजुची कार्यक्षेत्रातील गावाच्या पिण्याच्या पाण्याचा सोर्स विहिरी नळयोजना नदीपात्रातून आहे. आता नदीपात्र आटले आहे. त्यामुळे विहिरीचे पाणी आटल्यामुळे अनेक गावांना पिण्याचे पाणी नाही, जनावरांनाही नदी शिवारात पाणी नाही, पाखरे पाण्यावाचून मरताहेत, मला गेल्या ४ दिवसात अनेक गावचे सरंच गावकरी भेटले आहेत. पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा करावा अशी मागणी केली आहे. मी गेल्या २५ ते ३० वर्षापासून अखंडपणे हे काम दरवर्षी करत असतो व धरणातील पाणी नदीपात्रात सोडण्यासाठी पाठपुरावा करत असतो. येत्या २ दिवसात शिष्टमंडळ घेवून बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक साहेबांना भेटणार आहे.

गुढीपाडव्यापासून पाणी सोडण्यात यावे अशी मागणी करणार आहे. जेंव्हा श्री केंद्रेकर जिल्हाधिकारी होते. तेंव्हा आम्ही त्यांना भेटलो ते म्हणाले आमचे अधिकारी इंजि.ला घेऊन धरणावर येतो, पाहणी करतील मगच पाणी सोडले जाईल. आम्हाला न सांगता गुप्तपणे श्री केंद्रेकर साहेबांनी पाठक साहेबांना धरणाची पाहणी करायला पाठवले. नंतरच पाणी सोडले. यंदा तर धरणात पाणी भरपूर आहे. धरण तुडूंब भरलेले आहे.अंबलवाडी, नागापूर, लिंबुटा, बहादूरवाडी, पांगरी, गावचे तांडे, सबदराबाद, नाथ्रा, तळेगाव, माळहिवरा, तडोळी, वडखेल, कौठळी, देशमुख टाकळी आदी गावाचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. जनावरे, पाखरे यांचाही पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. दरवर्षी प्रमाणे याही पाणी सोडण्याबाबत प्रशासन आपल्या सहकार्य करतील अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे जेष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती व वाणधरण शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष व मार्गदर्शक फुलचंदभाऊ कराड यांनी केली

# दंगल सदृश्य परस्थिती हताळन्या साठी अंबाजोगाई शहर, ग्रामीण व बर्दापूर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यासाठी घेण्यात आली जमाव विसर्जन रंगीत तालीम

आंबजोगाई (प्रतिनिधी)

दंगल सदृश्य परस्थिती निर्माण झाल्या नंतर पोलिसांना ही वेळीच हताळता यावी या साठी अंबाजोगाई शहर, ग्रामीण व बर्दापूर पोलीस स्टेशन च्या सर्व कर्मचाऱ्या साठी जमाव विसर्जन रंगीत तालीम घेण्यात आली.येथील यशवंत राव चव्हाण चौका नजिक असलेल्या क्रीडा संकुलाच्या मैदानात पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शना खाली उप विभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या प्रमुख उपस्थिती मधे संपन्न झालेल्या या जमाव विसर्जन रंगीत तालीम प्रसंगी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनंचे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राम पडवळ, बर्दापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार ससाने यांच्या आधीपत्या खाली शहर पोलीस स्टेशन, ग्रामीण पोलीस स्टेशन व बर्दापूर पोलीस स्टेशनचे सर्व महिला पुरुष कर्मचारी उपस्थित होते.या सर्व कर्मचाऱ्यांना जमाव



विसर्जन रंगीत तालीम देण्या साठी बीड पोलिस मुख्यालयातून प्रशिक्षक म्हणून पो हे कॉ संजय रामराव भुतके यांची विशेष उपस्थिती होती.

या वेळी मैदानावर आंदोलन कर्ता जमाव तयार करण्यात आला होता. हा जमाव शासनाच्या व पोलिसांच्या विरोधात घोषणा देत होता, जमावाला शांत करण्या साठी ध्वनी क्षेपका द्वारे सह्यायक पोलीस निरीक्षक निलंगेकर हे सूचना देत होते. याच वेळी पोलीस कर्मचाऱ्यांना जमावाला हताळण्या संदर्भात सूचना देण्यात येत होत्या. संतप्त जमाव दगदफेक करत होता. याच वेळी जमाव पांगवण्या साठी सर्व प्रथम लाठीचार्ज, त्या नंतर ढाल सेक्शनचा प्रयोग, त्या नंतर गॅस सेक्शनचा प्रयोग, रायफल सेक्शनचा प्रयोग करण्यात आला. या वेळी जमावाला भडकवणाऱ्या मुख्यसूत्रधारास शोधून त्याला ताब्यात कसे घ्यायचे या संदर्भात सूचना देण्यात आल्या. तसेच गोळीबार करून जमाव पांगवताना जखमी होऊन पडलेल्या इसमास ताब्यात घेईन त्याला उपचारार्थ रुग्णालयात कसे पाठवायचे याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. एकूणच या रंगीत तालीमच्या वेळी पोलीस कर्मचारी व आंदोलनकर्ते यांच्यात उत्साह पहावयास मिळाला.

# कोण होणार महाराष्ट्राचा लाडका युवा कीर्तनकार

## आष्टी तालुक्यातून सचिन महाराज म्हस्के यांची निवड

आष्टी (प्रतिनिधी)

दि. १ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या सोनी मराठी या टीव्ही वरती कोण होणार महाराष्ट्राचा लाडका युवा कीर्तनकार यासाठी आष्टी तालुक्यातून सचिन महाराज मस्के सावरगावकर यांची निवड झालेली आहे.सचिन महाराज मस्के हे जोग वारकरी शिक्षण संस्था आळंदी येथे शिक्षण घेत आहेत. सचिन महाराज मस्के हे गुरुवर्य श्री ज्ञानेश्वरी कंठभूषण ह. भ. प. कृष्णा महाराज रासने यांच्यामुळे वारकरी संप्रदायात आले आहेत. जेंव्हा एक गरीब शेतकऱ्याचा मुलगा कीर्तनासाठी



उभा राहतो आणि तो टीव्ही वरती दिसतो, तेंव्हा एका शेतकरी बापाचा उर अभिमानाने भरून येतो. आज जगामध्ये पाहिलं तर नववी - दहावीच्या वर्गातील मुले व्यसनाच्या आहारी गेलेले आहेत, पण याच वयात सचिन महाराज मस्के सावरगावकर आज कीर्तन करतात हे कोणाच्यातरी आशीर्वादाचीच पुण्याई म्हणावे लागेल. आज माझ्या वयातील मुले, व्यसनाच्या आहारी गेले आहेत. पण मी याच वयामध्ये एवढ्या मोठ्या स्टेज वरती कीर्तन करण्याचा योग आला, यामागे माझे आई - वडील आणि बडे बाबा मच्छिंद्रनाथ यांचा मोठा कृपाशीर्वाद आहे. - सचिन महाराज मस्के सावरगावकर



आष्टी (प्रतिनिधी)

मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. आष्टी येथील आझाद उर्दू प्राथमिक शाळामध्ये इयत्ता तिसरीत शिक्षण घेत असलेला पठाण हसन अस्लम (वय ८ वर्ष) या लहान मुलाने आयुष्यातील पहिला रोजा कडक उन्हाळा सुरू असतानाही रविवार दिनांक २३ मार्च रोजी पुर्ण केला आहे. यावर्षीचा पवित्र रमजान महिना शनिवार दि. १ मार्च २०२५ रोजीच्या सायंकाळ पासून आरंभ झाला. पठाण हसन अस्लम याने दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोर नियम पाळत आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वी पुर्ण केल्याबद्दल नातेवाईक व इतरांनी कौतुक करत पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले.